# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

-----------------------------

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ / फाल्गुन ८, १९४७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्ये मंत्री** | |
| **(३)** | **जलसंपदा (विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री** | |
| **(४)** | **शालेय शिक्षण मंत्री** | |
| **(५)** | **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** | |
| **(६)** | **पणन, राजशिष्टाचार मंत्री** | |
| **(७)** | **वस्त्रोद्योग मंत्री** | |
| **(८)** | **सहकार मंत्री** | |

-----------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ३१**

-----------------------------

**मौजा बेसा (नागपूर ग्रामीण) येथील आनंद को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, नागपूर मधील सार्वजनिक जागेमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(१) * २३८९९ श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा बेसा (नागपूर ग्रामीण) येथील आनंद को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी, नागपूर मधील खसरा क्र.१० अ व १० ब या जागेवर टाकलेल्या ले-आऊट नकाशामधील सार्वजनिक उपयोगासाठी असलेल्या जागेपैकी ११,१०७ चौरस फुट जागा संस्थेचे सचिव श्री.कैलास चुटे यांनी आर्थिक लाभापोटी बेकायदेशीरपणे विकल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणने ले-आऊट मधील प्लॉट धारकांच्या सुविधेकरीता सार्वजनिक उपयोगाकरीता असलेल्या जागेवर बसविलेल्या ट्रान्सफार्मरची जागा/प्लॉट श्री.कैलास चुटे यांनी आर्थिक व्यवहार करुन प्लॉटधारक श्री.साळुंके यांना दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेसा ही ग्रामपंचायत असताना सदर सोसायटीचे सचिव श्री. कैलास चुटे यांनी सादर केलेल्या ले-आऊट नकाशात दोन सार्वजनिक उपयोगातील जागा असल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बेसा नगरपंचायतीला सादर केलेल्या नकाशामध्ये ले-आऊटच्या दक्षिणेकडील संपूर्ण सार्वजनिक उपयोगाकरीता असलेल्या जागेवर प्लॉट पाडून काही वर्षांपूर्वी बेकायदेशीर विकल्याचे निदर्शनास येते तसेच ले-आऊटच्या मध्यभागी असलेल्या ४११०७.५० चौरस फूट जागेपैकी ११,१०७ चौरसफूट जागा विक्रीपत्र न करता कब्जापत्र व करारनामा करुन वेगवेगळया व्यक्तींना कोट्यवधी रुपयात विकल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या गैरव्यवहाराबाबत श्री.अतूल तांबे, असिस्टंट रजिस्टार, हिंगणा यांच्याकडे संस्थेचे सदस्य व प्लॉट धारकांनी तक्रार केली असता याप्रकरणी दिलेला चौकशी अहवाल संशयास्पद व खोटा असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीच्या अनुषंगाने सोसायटीचे सचिव श्री.कैलास चुटे व असिस्टंट रजिस्ट्रार श्री.तांबे यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) माहे जानेवारी २०२६ मध्ये अशी बाब निदर्शनास आलेली नसून, मे, २०२५ मध्ये याबाबतची तक्रार प्राप्त झाली होती. मौजा बेसा येथील आनंद को.ऑप.हाऊसींग सोसायटी, नागपूर यांच्या खसरा क्र. १० अ व १० ब या जागेवर टाकलेल्या ले-आऊट नकाशामधील सार्वजनिक उपयोगासाठी असलेल्या ४११०७ चौ.फूट जागेपैकी १११०७ चौ.फुट जागेत, ७ भूखंड/प्लॉट नव्याने टाकून, त्यापैकी ६ भूखंड वेगवेगळया व्यक्तींना हस्तांतरित केले आहेत. नगरपंचायत, बेसा यांचेमार्फत शासनाच्या गुंठेवारी नियमाप्रमाणे भूखंड नियमित करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(२) हे खरे नाही.
संस्थेच्या सार्वजनिक उपयोगाच्या जागेवरील नवीन ७ प्लॉट पैकी प्लॉट क्र. २२९-एच वर, महावितरणने संस्थेच्या परवानगीशिवाय DP Transformer बसविला आहे. सदर जागेत Transformer असल्याने. संस्थेने सदर प्लॉट संस्थेच्या ताब्यात ठेवलेला आहे व कोणालाही विक्री करण्यात आलेला नाही.
(३) होय.
(४) अंशत: खरे आहे. संस्थेच्या दक्षिणेकडील सार्वजनिक उपयोगाची ३२५० चौ.फूट जागा अदयाप रिक्त असून, अन्य ४१,१०७.५० चौ.फुट जागेपैकी, ३०,०३७.५० चौ.फुट जागा बेसा नगर परिषदेला हस्तांतरित केलेली आहे . उर्वरित ११,१०७ चौ.फूट जागेचे ७ प्लॉट पाडून त्यापैकी ६ भूखंड वेगवेगळया व्यक्तींना हस्तांतरित करण्यात आले आहेत. संस्थेच्या सन २०२४-२५ च्या लेखापरिक्षण अहवालात आर्थिक गैरव्यवहाराबाबत उल्लेख दिसून आलेला नाही.
(५) व (६) संस्थेविरुध्द प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने, संबंधित सहायक निबंधकांनी चौकशी करुन, चौकशी अहवाल, संस्थेचा खुलासा, अभिप्राय व निष्कर्षासह सादर केला आहे. तथापि सदर अहवाल त्रोटक व मोघम स्वरुपाचा असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे संस्थेने हस्तांतरित केलेल्या ७ भूखंडांबाबत चाचणी लेखापरिक्षण करण्यात येईल व लेखापरिक्षण अहवालाअंती दोषी आढळून आल्यास सर्व संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल. त्याचप्रमाणे संबंधित सहायक निबंधक, सहकारी संस्था यांचेविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येईल.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

**परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील गैरव्यवहाराबाबत**

**(२) * २५११८ श्री.राजेश विटेकर (पाथरी), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्री.विजयसिंह पंडित (गेवराई), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील पाथरी, मानवत, वसमत, गंगाखेड, वझुर व शेळगाव या आणि इतर १०३ शाखेतून रुपये ८२ कोटी ४० लक्ष इतक्या रक्कमेचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबतच्या तक्रारी व अनुकंपा नोकर भरती, प्रोबेशन नोकर भरती, रोजंदारी नोकर भरती, बेकायदेशीर कर्ज वाटप, कागदपत्रांशिवाय

कर्ज वाटप अशा विविध नियमभंगाची व गैरप्रकारांची मुद्दे निहाय चौकशी करावी याबाबत विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांनी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, परभणी यांना लेखी अहवाल सादर करण्याबाबतचे आदेश माहे जानेवारी, २०२५ मध्ये दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत जिल्हा उपनिबंधक यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, परभणी यांना माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये व अवर सचिव (सहकार) यांनी याबाबत सहकार आयुक्त, पुणे यांना माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये पत्र दिले आहे तसेच, श्री बिडवई, विभागीय सहनिबंधक यांनी यासंदर्भात दिनांक ७ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान सहकार आयुक्त, पुणे यांना या पत्राबाबत कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे विविध गैरप्रकार करत असून त्या गैरप्रकारांची चौकशी करण्यासाठी लोकप्रतिनिधी व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वेळोवेळी कागदपत्रे, अहवाल व उत्तरे मागवूनही त्यांनी त्यासंदर्भातील माहिती मागील पाच वर्षांपासून दिलेली नसल्याने त्यांची चौकशी करून कारवाई करावी अशी तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, परभणी जिल्हा मध्यवर्ती बँक गैरव्यवहाराची सहकार आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयातील अपर निबंधक यांच्या स्तरावरुन चौकशी करण्यात येईल असे आदेश सहकार मंत्री यांनी माहे डिसेंबर, २०२५ मध्ये दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा उपनिबंधक, परभणी हे गैरप्रकार दडपण्यासाठी केवळ कागदोपत्री बनाव करुन विलंब करीत असल्याबाबतची तक्रार परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी सन २०२६ मध्ये प्रधान सचिव, सहकार यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २० नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या परिपत्रकामधील तरतुदीप्रमाणे विधानमंडळ सदस्यांना जास्तीत जास्त दोन महिन्यांच्या आत त्यांनी दिलेल्या पत्रावर कार्यवाही करून अंतिम उत्तर देण्यात यावे असे निर्देश असताना श्री.कुरुंदकर व सहकार विभागातील वरिष्ठ अधिकारी यांनी त्याकडे दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उक्त सर्व प्रकरणाची सखोल चौकशी केली आहे काय, सदर चौकशीच्या अनुषंगाने बँकेमधील आर्थिक गैरव्यवहारासंदर्भातील सहकार विभाग, मंत्रालय, सहकार आयुक्त, पुणे व विभागीय सहनिबंधक कार्यालय, छत्रपती संभाजी नगर यांनी सदर प्रकरणाची माहिती देण्यासाठी चार महिन्यांपेक्षा अधिकचा वेळ लावल्याने वरील परिपत्रकाचा नियमभंग झाल्यामुळे त्यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) होय.

(५) श्री. राजेश केशवराव गायवळ व श्री. गंगाधर जयवंतराव गाडगे यांचे अनुक्रमे दिनांक १३ नोव्हेंबर, २०२५ व दिनांक ०३ जानेवारी, २०२६ रोजीचे तक्रार अर्ज प्राप्त झाले आहेत.

(६) नाही.

दि. परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., परभणी या बँकेच्या विविध तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. सदर तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरिक्षण), छत्रपती संभाजीनगर यांचेमार्फत चौकशी सुरु आहे.

(७) व (८) दि. परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., परभणी बँकेच्या संदर्भात प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८९-अ नुसार विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरिक्षण), छत्रपती संभाजीनगर यांचेमार्फत बँकेची तपासणी सुरु आहे. अद्याप तपासणी अहवाल अप्राप्त आहे.

-----------------

**राज्यातील मराठी माध्यमांच्या शाळांमधील पटसंख्या वाढविणेसह**
**शिक्षक-शिक्षकेत्तर पदे भरण्याबाबत**

**(३) * २४६४८ श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी माध्यमांच्या शाळांमधील विद्यार्थी पटसंख्या सातत्याने कमी होत असल्याने मागील १५ वर्षांच्या कालावधीत राज्यातील खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमधील सुमारे २२ हजार शाळांतील तब्बल ७२ हजार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे घटली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठी शाळांकडे विद्यार्थ्यांचा कल कमी होणे, ग्रामीण भागातून रोजगारासाठी शहरांकडे होणारे स्थलांतर तसेच अन्य सामाजिक-आर्थिक कारणांमुळे विद्यार्थी संख्या घटल्याने शिक्षक, शिक्षकेतर पदांवर प्रतिकूल परिणाम झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये आवश्यक त्या सर्व मूलभूत शैक्षणिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देऊन घटलेली विद्यार्थी पटसंख्या वाढविण्यासाठी तसेच जिल्हा परिषदा व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शिक्षक शिक्षकेत्तर रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

सन २०२४-२५ मध्ये शिक्षणाधिकारी लॉगीनला उपलब्ध करून देण्यात आलेल्या संचमान्यतेनुसार राज्यामध्ये प्राथमिक स्तरावर खाजगी व्यवस्थापनाच्या ६,९६३ शाळा असून त्यामध्ये आधार प्रमाणित विद्यार्थीसंख्येच्या आधारावर एकूण ४९,५४३ शिक्षक पदे मंजूर झाली आहेत. तसेच माध्यमिक स्तरावर खाजगी व्यवस्थापनाच्या १७,२६३ शाळा असून त्यामध्ये आधार प्रमाणित विद्यार्थीसंख्येच्या आधारावर एकूण १,९२,५८४ शिक्षक पदे मंजूर झाली आहेत. पालकांचा कल इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये पाल्यांचा प्रवेश घेण्यासाठी वाढत असल्याने शहरी भागात स्थलांतर होत असल्याने ग्रामीण भागात विद्यार्थी संख्येत काही प्रमाणात घट झाल्याचे दिसून येते.

(३) शाळांमधील गळती कमी करण्यासाठी सातारा आणि सांगली येथील ५४० शाळांचे मॉडेल शाळांमध्ये रुपांतर करण्यात आले आहे. त्याच धर्तीवर शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये विद्यार्थी वाढ होण्याच्या दृष्टीने ४७७ "आदर्श शाळा" व ८२७ "पीएमश्री शाळा" निर्माण करण्यात आल्या आहेत. तसेच, कमी पटाच्या मराठी शाळा सुरु असताना शाळांचा पट वाढविणे व मराठी शाळा टिकविणे या बाबत शाळा प्रवेशोत्सव, इयत्ता पहिली ते आठवी पर्यतच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप, प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजना, इयत्ता पहिली ते आठवीपर्यतच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, पायमोजे, बुट, निपुण महाराष्ट्र, समग्र शिक्षा अभियान,

स्टार्स प्रकल्प, पीएमश्री प्रकल्प, माझी शाळा सुंदर शाळा, नियतकालिक चाचण्या, शिक्षक प्रशिक्षण उपक्रम इ.उपाययोजनांची अंमलबजावणी शासनाकडून करण्यात येत आहे. जिल्हा परिषदा व स्थानिक स्वराज्य संस्था मधील रिक्त पदे शिक्षक अभियोग्यता आणि बुध्दिमत्ता चाचणी (TAIT-२०२५) मधील निकालाच्या आधारे भरण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील प्राध्यापक व प्राचार्य पदभरती प्रक्रियेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(४) * २७३२५ श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या २०८८ प्राध्यापक पदांच्या भरती प्रक्रियेत अनेक पात्र उमेदवारांना डावलून संस्थाचालक, संबंधित विद्यापीठांनी नेमलेल्या निवड समितीचे सदस्य व उच्च शिक्षण संचालनालयाच्या प्रतिनिधींच्या संगनमताने आर्थिक गैरव्यवहार करून ठराविक उमेदवारांची नियुक्ती करण्यात आल्याबाबतच्या एकूण २७ तक्रारी उच्च शिक्षण संचालनालयाकडे (DHE) प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गुणवंत उमेदवारांवर अन्याय झाल्याच्या कारणास्तव सदर भरती प्रक्रियेत सहभागी असलेल्या सर्व सहसंचालकांची विशेष तपास पथक (SIT) मार्फत चौकशी करण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र नव प्राध्यापक संघटनेने मा. मुख्यमंत्री यांच्याकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, नेट, सेट, पीएच.डी. धारक संघर्ष समितीचे राज्य समन्वयक व सफुक्टोचे (SFUCTO) सदस्य यांनी प्राध्यापक व प्राचार्य भरतीच्या संपूर्ण नियुक्ती प्रक्रियेवर आक्षेप घेत गुणवंत अर्जदारांचे हक्क डावलले गेल्याचा आरोप करत बेकायदेशीर नियुक्त्या तातडीने रद्द करून संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र समितीद्वारे चौकशी करण्याची मागणी संचालक, पुणे, उच्च शिक्षण यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित विभागामार्फत अपेक्षित कार्यवाही होत नसल्याच्या पार्श्वभूमीवर नेट, सेट, पीएच.डी. धारक संघर्ष समितीचे राज्य समन्वयक व सफुक्टोचे सदस्य यांनी प्राध्यापक व प्राचार्य भरती प्रक्रियेत झालेल्या कथित गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी थेट मा. मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्यातील प्राध्यापक व प्राचार्य भरती प्रक्रियेची त्रयस्थ संस्थेमार्फत अथवा उच्चस्तरीय स्वतंत्र समितीद्वारे चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक संवर्गाच्या भरती प्रक्रियेबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्याची बाब खरी आहे.
(२) महाराष्ट्र नव प्राध्यापक संघटनेने भरती प्रक्रियेतील गैरव्यवहाराबाबत चौकशीची मागणी केली आहे, हे खरे आहे.
(३) नेट, सेट, पीएच.डी. धारक संघर्ष समितीचे राज्य समन्वयक व सफुक्टोचे (SFUCTO) सदस्य यांनी प्राध्यापक व प्राचार्य भरतीच्या संपूर्ण नियुक्ती प्रक्रियेवर आक्षेप घेत गुणवंत अर्जदारांचे हक्क डावलले गेल्याचा आरोप करत बेकायदेशीर नियुक्त्या तातडीने रद्द करून संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र समितीद्वारे चौकशी करण्याबाबतची मागणीचे निवदेन संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना प्राप्त झाले नाही.

(४) हे खरे नाही. तथापि, नेट,सेट,पीएच.डी. धारक संघर्ष समितीचे राज्य समन्वयक यांचे दिनांक २५ जानेवारी, २०२५ व दिनांक १४ मे, २०२५ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे. सदर निवेदनामध्ये १००% प्राध्यापक पदभरतीबाबतचा शासन निर्णय निर्गमित करणे व प्राध्यापक पदभरतीची अंतिम कार्यवाही करण्याबाबत मागणी करण्यात आली आहे.

(५) अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील शिक्षक पदांची निवड प्रक्रिया विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ आणि शासन निर्णय दिनांक १० मे, २०१९ व दिनांक ०१ जानेवारी, २०२४ नुसार संबंधित विद्यापीठाच्या निवड समितीमार्फत पार पाडली जाते.

या निवड समितीमध्ये संबंधित संस्थेचे अध्यक्ष हे निवड समितीचे अध्यक्ष असतात तसेच, विद्यापीठ प्रतिनिधी (कुलगुरू नामनिर्देशित सदस्य), विषय तज्ज्ञ, अनुसुचति जाती/जमाती/इ.मा.व./ अल्पसंख्याक, महिला/दिव्यांग प्रवर्ग, यांचे प्रतिनिधीत्व करणारे शिक्षणतज्ञ आणि शासन प्रतिनिधी यांचा समावेश असतो. निवड समितीमधील प्रत्येक सदस्याला गुणवत्तेच्या आधारावर स्वतंत्र मूल्यांकन करण्याचा अधिकार असतो.

सहायक प्राध्यापक व प्राचार्य पदभरतीमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबतच्या तक्रारींसोबत ठोस पुरावादर्शक तपशिल दिलेला नाही. तथापि, महाराष्ट्र नव प्राध्यापक संघटनेच्या तक्रार अर्जामध्ये अन्य मागण्यांचाही समावेश असून सर्व मागण्याच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्याविषयी संचालक, उच्च यांना शासन पत्र दिनांक २० जानेवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

----------------

## मुंबईतील अंधेरी (पश्चिम) येथील शाळेत ऑटिस्टिक जुळ्या विद्यार्थ्यांना RTE अंतर्गत प्रवेश नाकारल्याबाबत

**(५) * २३०८३ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंधेरी (पश्चिम) येथील एका खाजगी विनाअनुदानित शाळेने शिक्षण हक्क कायदा (RTE) अंतर्गत रितसर जागा वाटप होऊनही सात वर्षांच्या ऑटिस्टिक जुळ्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास नकार दिल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेने "आवश्यक सुविधांचा अभाव" असल्याचे कारण देत पालकांना स्वखर्चाने 'शॅडो टीचर' नेमण्याची सक्ती केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात संबंधित पालकांनी शिक्षण विभागाकडे तक्रार दाखल केली असता त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सर्वसमावेशक शिक्षणाच्या शासन धोरणाच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारे अपंग व विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांबाबत भेदभाव करणाऱ्या संबंधित शाळेविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, अशा विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांना खाजगी शाळांमध्ये विनामूल्य आवश्यक पायाभूत सुविधा व सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) केंद्र शासनाच्या बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकास इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे देण्याची तरतूद केलेली आहे. त्यानुसार, सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील विनाअनुदानित ए. एच. वाडिया स्कुल, अंधेरी या शाळेत दोन विशेष गरजा असणाऱ्या (स्वमग्न) बालकांना आरटीई २५ टक्के अंतर्गत प्रवेश दिलेले आहेत. सदर बालकांच्या पालकांनी "शॅडो टीचर" ची मागणी केली असता, सदरची शाळा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या UDISE यादीमध्ये येत नसल्याने या शाळेमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत अनुज्ञेय सुविधा उपलब्ध करून देता येऊ शकल्या नाहीत.

समग्र शिक्षा अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व शासकीय अनुदानित शाळांमधील २१ प्रकारच्या विशेष गरजाधिष्ठित विद्यार्थ्यांना समावेशित शिक्षणांतर्गत दिव्यांग प्रकारानुसार शैक्षणिक व सहाय्यभूत सेवांचा लाभ देण्यात येत आहे.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये आधारकार्डअभावी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा हक्क बाधित झाल्याबाबत

**(६) * २६२५९ श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री. विलास भुमरे (पैठण), :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये आधारकार्ड नसलेल्या विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षांपासून प्रवेश देऊ नये असे तोंडी आदेश पालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शाळांच्या मुख्याध्यापकांना दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरात सध्या सुमारे ५९ हजार ३५८ विद्यार्थ्यांकडे आधारकार्ड नसतानाही त्यांना शिक्षण दिले जात आहे तसेच आधारकार्ड व अन्य कागदपत्रांच्या अभावामुळे अनेक विद्यार्थ्यांची "अपार आयडी" व "यु-डायस" नोंदणी होत नसल्याने ते दरवर्षी देण्यात येणाऱ्या २७ शालोपयोगी वस्तूंपासून वंचित राहत आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आधारकार्डशिवाय प्रवेश दिल्यास संबंधित मुख्याध्यापकांवर कारवाई केली जाईल असा दबाव वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून टाकण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने आधारकार्ड नसलेल्या विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा हक्क अबाधित रहावा तसेच प्रवेश, अपार आयडी, यु-डायस नोंदणी व शालेपयोगी लाभ सुरू रहावेत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) यांच्यामार्फत बालकांच्या ५ व्या वर्षी व पुन्हा १५ व्या वर्षी आधार बायोमेट्रिक अद्ययावत करणे आवश्यक असल्याने देशातील सर्व शाळांना आधार अद्ययावत करणेबाबत आवाहन केले आहे. विविध पध्दतीने ऑनलाईन माहिती व स्पर्धा परीक्षा/ विद्यापीठ परीक्षांमध्ये नोंदणी करताना विद्यार्थी व त्यांच्या पालकांना अडचणी येऊ नयेत, याकरिता वेळेत बायोमेट्रिक अपडेट करणे महत्त्वाचे असल्याचे UIDAI ने स्पष्ट केले आहे.

आधार प्राधिकरण (UIDAI) यांनी सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना मुलांचे आधार कार्ड काढण्याकरिता विशेष मोहिम राबविणेबाबत कळविले आहे. आधार अद्ययावत करणे ही प्रक्रिया शाळांमधून शिबिरांच्या माध्यमातून अधिक वेगाने पूर्ण होणे शक्य असल्याने सदर कार्यवाही मोहिम स्वरुपात राबविण्याबाबतच्या सूचना आयुक्त (शिक्षण) यांना दिनांक ०१.०९.२०२५ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

आधार नोंदणी किंवा अद्ययावत न झालेल्या विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कोणत्याही योजनेपासून वंचित ठेवण्यात येत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील शाळांना आर.टी.ई. अंतर्गत देण्यात येणाऱ्या प्रतिपूर्ती भत्त्यात वाढ करण्याबाबत**

**(७) * २८४२४ श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम (RTE) अंतर्गत विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या प्रतिपूर्ती भत्त्यात सन २०१७ ते २०२५ या कालावधीत कोणतीही वाढ करण्यात आलेली नसून शाळांच्या वाढलेल्या शुल्क संरचनेच्या पार्श्वभूमीवर सदर रक्कम अपुरी पडत असल्याने विद्यार्थ्यांना व शाळांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात शाळांचे शिक्षण शुल्क, कर्मचारी वेतन, वीज दर, भाडे व इतर शैक्षणिक खर्च मोठ्या प्रमाणात वाढले असताना आर.टी.ई. अंतर्गत देण्यात येणाऱ्या प्रतिपूर्तीची कोट्यवधी रुपयांची रक्कम वेळेवर वितरित न झाल्याने अनेक शाळा आर्थिक अडचणीत आल्याचे निदर्शनास आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आर.टी.ई. अंतर्गत मोफत शिक्षणाची सध्याची मर्यादा इयत्ता आठवीवरून इयत्ता दहावीपर्यंत वाढविण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या प्रतिपूर्ती भत्त्यात वाढ करण्याबाबत शिक्षणतज्ज्ञांकडून करण्यात आलेल्या मागण्या शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला आहे काय व त्याची सद्यःस्थिती काय आहे,

(५) असल्यास, राज्यातील शाळांना देण्यात येणाऱ्या आर.टी.ई. प्रतिपूर्ती भत्त्यात वाढ करून तो विनाविलंब अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकास इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे देण्याची तरतूद केलेली आहे. त्यानुसार, राज्य शासनाने अगोदर शाळांनी केलेल्या शैक्षणिक खर्चाच्या प्रतिपुर्तीची रक्कम वितरित करण्यात येते. तद्नंतर राज्याने सर्व शिक्षा अभियान वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक निर्मितीमध्ये राज्यामार्फत शाळांना वितरित करण्यात आलेली तरतुदीची मागणी केंद्र शासनाकडे करण्यात येते.

राज्य शासनाने सन २०१२-१३ पासून सन २०२५-२६ पर्यंत आरटीई २५ टक्के अंतर्गत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीसाठी रु.१७२७.३० कोटी इतका निधी संबंधित शाळांना वितरित केला

आहे. सद्य:स्थितीमध्ये आरटीई अंतर्गत शुल्क प्रतिपूर्तीकरिता रु. २९५०.६४ कोटी इतक्या रक्कमेची आवश्यकता आहे.

राज्य शासनाने वितरित केलेला निधी शिक्षण संचालक (प्राथमिक), प्राथमिक शिक्षण संचालनालयास उपलब्ध करून देण्यात येतो. सदर निधी संचालनालयाच्या स्तरावरून शिक्षणाधिकारी यांच्यामार्फत मागणीच्या प्रमाणात संबंधित शाळांना वितरित करण्यात येतो.

(३), (४) व (५) केंद्र शासनाने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मध्ये आजतागायत केलेल्या सुधारणांनुसार राज्य शासनाने त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी वेळोवेळी सुधारणा केली आहे. त्याअनुषंगाने बालकांची २५ टक्के प्रवेशाची प्रक्रिया राबविताना निर्माण होणाऱ्या अडचणींबाबत कालानुरूप सुधारणा करणे आवश्यक असून बालकांच्या २५ टक्के प्रवेशाची प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने राबविण्यासाठी आयुक्त (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल विचारात घेऊन, शासन निर्णय, दिनांक १२.०२.२०२६ अन्वये बालकांच्या शाळांमधील प्रवेशाच्या राखीव जागांकरिता सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(५) आरटीई अंतर्गत खर्चाच्या शुल्क प्रतिपूर्तीचा दर कोविड-१९ नंतर सन २०२३-२४ पासून रु.१७,६७०/- इतका निश्चित केलेला आहे. या दरानुसारच शाळांना आरटीई २५ टक्के प्रतिपूर्तीची रक्कम देण्यात येते. आरटीई २५ टक्के अंतर्गत प्रवेश देताना शाळांनी सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून वंचित व दुर्बल घटकातील मुलांना २५ टक्के जागांवरील शिक्षण देणे अपेक्षित आहे.

-----------------

**राज्यातील पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनेचा लाभ मिळण्याबाबत**

**(८) * २३३८३ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.अमोल जावळे (रावेर), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.राजु तोडसाम (अर्णी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २०१७ मध्ये जाहिर केलेल्या कर्जमाफी योजनेचा लाभ अद्यापी ६ लाख ५६ हजार शेतकऱ्यांना मिळाला नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी कर्ज माफी योजना व महात्मा ज्योती फुले शेतकरी कर्ज मुक्ती योजना व याशिवाय पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान या दोन्ही योजनांचे विषय ५ वर्षांत प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शेतकऱ्यांसाठी रु.५ हजार ९०० कोटी इतक्या रकमेची मागणी सहकार विभागाने वित्त विभागाकडे करूनही रु.५०० कोटी रूपयांची तरतूद माहे डिसेंबर, २०२५ च्या हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागण्यांमध्ये करण्यात आली असून उक्त अपुऱ्या निधीच्या तरतुदीमुळे अनेक पात्र शेतकऱ्यांची कर्जमुक्ती होण्यास अडथळा निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे,

(४) असल्यास, राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर सर्व जिल्हा मध्यवर्ती बँकांकडून दिनांक ३० जून, २०२५ रोजी वा त्यादरम्यान थकीत कर्जदारांची आणि मागील पाच वर्षांतील नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांची माहिती मागविण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली असून सदर बँकांकडून माहिती वेळेत प्राप्त न झाल्यामुळे पात्र शेतकरी कर्जमाफी योजनेपासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सन २०१६ पासून उद्योजकांचे तब्बल १७ लाख कोटी कर्ज एनपीए (बुडीत) ठरविण्यात आल्यानंतरही ही कर्जे निर्लेखीत केली असून यावर्षी सार्वजनिक बँकांसाठी उद्योजकांसाठी (कर्जबुडव्या उद्योगपती) रु.७० हजार कोटी इतकी तरतूद केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) तसेच, मागील पावसाळ्यात अतिवृष्टी आणि महापुरामुळे पिकांचे मोठे नुकसान झाल्याने राज्यातील शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून त्यांना दिलासा देण्यासाठी अशा प्रकारची कर्जमाफी किंवा सवलत देण्याचे शासनाचे नियोजन आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्ज थकबाकीचा सविस्तर अभ्यास करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, त्यातील शिफारशी कोणत्या आहेत,

(८) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने राज्यातील पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनेचा लाभ मिळण्यासाठी तसेच कर्जमाफीसाठी वित्त विभागाकडून उर्वरित निधी मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) होय.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ अंतर्गत लाभास पात्र असलेल्या ५०.६० लाख शेतकऱ्यांपैकी ४४.०४ लाख शेतकऱ्यांना योजनेचा लाभ देण्यात आला आहे. तसेच सदर योजनेंतर्गत पात्र असलेल्या ६.५६ लाख शेतकऱ्यांना लाभ देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे. त्याचप्रमाणे महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०१९ अंतर्गत पात्र असलेल्या ३२.४२ लाख शेतकऱ्यांपैकी ३२.२९ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजनेअंतर्गत योजनेच्या निकषानुसार अनुदानास पात्र असलेल्या व आधार प्रमाणिकरण केलेल्या १४.५० लाख शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ आदा करण्यात आला आहे.

(४) नाही.

राज्यातील शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून, शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजनांची शिफारस शासनास करण्यासाठी दिनांक ३०.१०.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये उच्चाधिकार समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीच्या अभ्यासासाठी राज्यातील बँकांमार्फत शेतकऱ्यांना दिलेल्या कृषी कर्जाची व दि. ३०.०६.२०२५ व दि. ३०.०९.२०२५ रोजीच्या थकीत कृषी कर्जाची त्याचप्रमाणे मागील पाच वर्षामध्ये पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कर्जाची माहिती बँकांकडून मागविण्यात आली आहे. यापैकी

बँकांकडील अपेक्षित ५४.६३ लाख थकीत कर्ज खात्यापैकी ५२.८० लाख कर्ज खात्यांची माहिती प्राप्त झाली आहे. या माहितीचे संगणकीय संस्करण तथा विश्लेषण उच्चाधिकार समितीमार्फत करण्याची कार्यवाही सुरु आहे. या संस्करणानंतर समितीकडून उपाययोजना / शिफारशी अपेक्षित आहेत.

(५) नाही.

अशा प्रकारची कोणतीही तरतूद शासनाकडून करण्यात आलेली नाही. सदरची बाब केंद्र शासनाच्या कक्षेतील आहे.

(६) सन २०२५ च्या खरीप हंगामामध्ये अतिवृष्टी व पूर यामुळे बाधित झालेल्या तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांना द्यावयाच्या सवलतीबाबत महसूल व वन विभागाकडील दिनांक १०.१०.२०२५ रोजीच्या शासन निर्णयास अनुसरुन राज्यातील अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे बाधित झालेल्या तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांच्या सहकारी पीक कर्जाचे पुनर्गठन व शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती (१ वर्षासाठी) देण्याबाबत राज्यस्तरीय बँकर्स समिती (SLBC), महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई त्याचप्रमाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना दिनांक २६.११.२०२५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

राज्यातील शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजनांची शिफारस शासनास करण्यासाठी दिनांक ३०.१०.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये उच्चाधिकार समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीच्या शिफारशी विचारात घेऊन राज्यातील आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(७) उच्चाधिकार समितीने अद्याप शासनास अहवाल सादर केलेला नाही.

(८) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ या योजनेची संगणकीय प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी शासनाने दिनांक ०३.१२.२०२५ रोजी मान्यता दिली आहे. सदर योजनेकरीता सन २०२५ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये वित्त विभागाकडून पुरवणी मागणीव्दारे मंजूर करण्यात आलेला रु. ५०० कोटी निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये या योजनेकरीता रु. ५९७५.५१ कोटी नियतव्ययाची मागणी नियोजन व वित्त विभागास करण्यात आली आहे.

-----------------

## चोपडा (जि.जळगाव) येथील गुळ मध्यम सिंचन प्रकल्पांतर्गत भूसंपादन झालेल्या शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(९) * २५६२५ श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा (जि.जळगाव) येथील गुळ मध्यम सिंचन प्रकल्पांतर्गत सन २००८ - २००९ या कालावधीत शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या असून सदर प्रकल्प सन २००९ मध्ये पूर्ण झाल्यानंतरही १६९ शेतकऱ्यांना भूसंपादनाची रक्कम मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असले तरीही अद्याप संबंधित शेतकऱ्यांना भूसंपादनाची रक्कम न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त सिंचन प्रकल्पांतर्गत भूसंपादन झालेल्या शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला तात्काळ देण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये जलसंपदा मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने भूसंपादन झालेल्या शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

गुळ मध्यम प्रकल्पांतर्गत धरण, कालवा व वितरीकांची कामे सन २००९ मध्ये पूर्ण झाली आहेत. सदर कालावधीत कालवा व वितरीकांचे कामांसाठी भूसंपादनाची कार्यवाही करण्यात आली होती. तथापि सन २०१३ च्या नविन भूसंपादन कायदा अस्तित्वात आल्यामुळे सदर निवाडा व्यपगत झाला.

तद्नंतर सन २०१६ मध्ये पुन:श्च सरळ खरेदीने खाजगी वाटाघाटीद्वारे भुसंपादनाची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार प्रकल्पांतर्गत कालवा वितरीका कामासाठी एकूण ४९० शेतकऱ्यांची एकूण ९५.११ हे. क्षेत्र संपादनाची कार्यवाही करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत उर्वरीतपैकी १७६ शेतकऱ्यांच्या ३५.८१ हे. क्षेत्र संपादन करणेसाठी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदीसाठी दर निश्चित झालेले आहेत. तसेच ११ खातेदारांचे २.२ हे. क्षेत्रासाठी भूसंपादन कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) उर्वरीत १७६ शेतकऱ्यांच्या ३५.८१ हे. क्षेत्र संपादन करणेसाठी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदीसाठी दर निश्चित झालेले आहेत. तसेच ११ खातेदारांचे २.२ हे. क्षेत्रासाठी भूसंपादन कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इस्लामपूर (ता. किनवट, जि. नांदेड) येथील जिल्हा परिषद शाळेतील शालेय पोषण आहारात अळ्या आढळून आल्याबाबत

**(१०) * २५९८३ श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री. हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इस्लामपूर (ता. किनवट, जि. नांदेड) येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या मध्यान्ह भोजनाच्या जेवणात अळया आढळून आल्याची घटना दिनांक २ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पालकांनी विचारणा केल्यानंतर संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी जेवणात अळया निघाल्याची कबुली दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून संबंधित शाळेचे मुख्याध्यापक यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्या दिनांक ५ जानेवारी, २०२६ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले असून त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांच्या कापसाला हमीभाव मिळणेबाबत

**(११) * २३८७३ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.श्याम खोडे (वाशिम), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांच्या कापसाला किमान आधारभूत किंमत (हमीभाव) मिळावी यासाठी केंद्र सरकारच्या सीसीआयमार्फत (CCI) कापूस खरेदी केंद्रे सुरू करण्याची योजना शासनामार्फत राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जालना जिल्ह्यात भारतीय कापूस महामंडळामार्फत (सीसीआय) कापूस खरेदीसाठी ‘कापूस किसान ॲप’द्वारे स्लॉट बुकिंगची अट लागू करण्यात आली असून ॲपमधील तांत्रिक अडचणींमुळे अनेक शेतकऱ्यांना स्लॉट बुकिंग करता न आल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिल्लोड (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यात कापूस उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठी असताना अद्याप जिनिंग-प्रेसिंग ठिकाणी सीसीआयची (CCI) कापूस खरेदी केंद्र सुरू करण्यात आले नसल्यामुळे शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दराने कापूस विकावा लागला, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच श्रीरामपूर (जि.अहिल्यानगर) तालुक्यातील महांकाळ वाडगाव येथील शासकीय कापूस खरेदी केंद्रात विक्रीसाठी आणलेला कापूस माल ग्रेडचे कारण देऊन नाकारला जात असून सदर नाकारण्यात आलेला कापूस पुन्हा शासकीय खरेदी केंद्रावर एमएसपीच्या हमीभावाने विकण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) त्याचप्रमाणे अमळनेर (जि.जळगाव) येथील कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत सुरू असलेल्या कापूस खरेदी केंद्रावर खरेदी प्रक्रिया, नोंदणी, वजन व दर निश्चितीबाबत गंभीर समस्या निर्माण झाल्यामुळे शेतकऱ्यांनी “विशेष सभा” घेऊन विरोध दर्शविल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, कापूस खरेदी केंद्रचालक व सीसीआयचे ग्रेडर संगनमताने शेतक-यांची अडवणूक करत प्रती क्विंटल रु.८०० ते १००० इतकी लूट करित असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, राज्यात सीसीआय (CCI) कडून कापूस खरेदीसाठी प्रति एकर फक्त ५.६० क्विंटल उत्पादन मर्यादा लागू आहे, प्रत्यक्ष परिस्थितीपेक्षा अत्यंत कमी मर्यादा असून त्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे उत्पादन खरेदी बाहेर राहण्याची शक्यता निर्माण होते तसेच पश्चिम विदर्भ अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम आदी कापूसपट्टीमध्ये प्रत्यक्ष शेतकरी प्रति एकर १२ ते १५ क्विंटल पर्यंत कापूस उत्पादन घेतात, हे ही खरे आहे काय,

(८) असल्यास, केंद्र सरकारने दिनांक १ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर, २०२५ या तीन महिन्यांसाठी कापसावरील ११ टक्के आयात शुल्क रद्द केल्याने राज्यातील शेतकऱ्यांनी आपला कापूस बाजारात विक्रीसाठी आणायला सुरुवात केली आणि सीसीआयने एमएसपी दराने कापूस खरेदी करण्यास दिरंगाई केल्याने व्यापाऱ्यांनी ६६.०६ टक्के कापूस बाजारभावाने म्हणजेच एमएसपी पेक्षा कमी दराने खरेदी केल्याने कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे करोडो रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती दिनांक २२ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(९) असल्यास, उक्त सर्व प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कापसाला योग्य भाव मिळणे, ॲप व स्लॉट बुकिंगमधील त्रुटी दूर करणे, खरेदी केंद्रे वेळेत सुरु करणे, कापूस खरेदी केंद्रावर खरेदी प्रक्रिया, नोंदणी, वजन व दर निश्चितीबाबत तसेच शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कापसावर बोनस किंवा भावांतर योजना लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय, हे खरे आहे.

किमान आधारभूत किंमत दराने कापूस खरेदी करण्यासाठी केंद्र शासनाच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत भारतीय कपास निगम (सी.सी.आय.) ही नोडल संस्था आहे.

(२) हे खरे नाही.

सी.सी.आय. ने कापूस हंगाम २०२५-२०२६ मध्ये कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या सोयीसुविधेसाठी आणि खरेदी प्रक्रीयेत पारदर्शकता सुनिश्चीत करण्यासाठी 'कपास किसान' या मोबाईल ॲपद्वारे किमान आधारभूत दराने कापूस खरेदी सुरू केली आहे.

नोंदणी, स्लॉट बुकिंग सुलभ व्हावे व शेतकऱ्यांना अडचणी येऊ नयेत म्हणून सी.सी.आय. ने स्थानिक वर्तमानपत्रे, रेडिओ जिंगल्स, सोशल मीडिया, कृषी उत्पन्न बाजार समिती इत्यादी द्वारे शेतकऱ्यांमध्ये जनजागृती केलेली आहे.

राज्यात एकूण ७.२० लाख शेतकऱ्यांनी 'कपास किसान' या मोबाईल ॲपद्वारे यशस्वीरित्या स्व-नोंदणी केली असून स्लॉट बुकिंग आणि कापूस खरेदी सुरळीतपणे सुरू आहे.

शेतकऱ्यांच्या समस्यांच्या जलद निराकरणासाठी सी.सी.आय. च्या छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्यालयाने व्हॉटसॲप हेल्पलाईन उपलब्ध करुन दिली आहे.

जानेवारी, २०२६ मध्ये 'कपास किसान' ॲपमध्ये तांत्रिक अडचणी आल्याची कोणतीही तक्रार सी.सी.आय. कडे प्राप्त झालेली नाही.

(३) सी.सी.आय. मार्फत सिल्लोड कापूस खरेदी केंद्रावर दिनांक २४ नोव्हेंबर २०२५ पासून कापूस खरेदी सुरू करण्यात आली होती. त्यानंतर दिनांक ०५ डिसेंबर, २०२५ ते दिनांक २५ डिसेंबर, २०२५ दरम्यान खरेदी प्रक्रिया तात्पुरती मंदावली होती.

कापूस हंगाम २०२५-२०२६ साठी सिल्लोड कापूस खरेदी केंद्रासाठी नियुक्त केलेल्या सर्व १८ जिनिंग-प्रेसिंग फॅक्टरींना पणन संचालनालयामार्फत ना-हरकत प्रमाणपत्र देऊन सब-यार्ड घोषित केल्याने कापूस खरेदी सुरळीत सुरु झाली आहे.

सिल्लोड केंद्रातील जिनिंग-प्रेसिंग फॅक्टरीमधून सी.सी.आय. ने दिनांक १७ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत एकूण ७४,१६३ क्विंटल कापूस खरेदी केला आहे.

(४) हे खरे नाही.

कापूस हंगाम २०२५-२०२६ साठी सी.सी.आय. ने 'कपास किसान' ॲपद्वारे कापूस खरेदी प्रक्रिया डिजिटल केली आहे. केंद्र सरकारने जाहीर केलेल्या एम.एस.पी. मार्गदर्शक तत्त्वांनुसार कापूस खरेदी काटेकोरपणे केली जात आहे.

शेतकरी 'कपास किसान' ॲपद्वारे स्व-नोंदणी आणि स्लॉट बुकिंग करतात. सर्व नोंदणीकृत शेतकऱ्यांची कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत पडताळणी करण्यात येते. नोंदणीकृत आणि पडताळणी झालेल्या शेतकऱ्यांनी एम.एस.पी. गुणवत्ता मापदंडाचा आणलेला कापूस सी.सी.आय. खरेदी करते.

स्लॉट बुक न केलेल्या किंवा ज्यांचा कापूस एम.एस.पी. गुणवत्ता मापदंडाची पूर्तता करत नाही अशा शेतकऱ्यांकडून कापूस खरेदी केला जात नाही. त्यामुळे नाकारलेला कापूस पुन्हा त्याच केंद्रावर विकण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

तसेच श्रीरामपूर केंद्रावर कोणत्याही शेतकऱ्याकडून सी.सी.आय.ला व महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाला एम.एस.पी. ने कापूस खरेदीबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नसून कापूस खरेदीचे काम सुरळीतपणे सुरू आहे.

(५) माहे जानेवारी, २०२६ मध्ये अमळनेर, जि.जळगाव खरेदी केंद्रावर खरेदी प्रक्रिया, नोंदणी, वजन किंवा किंमत निश्चितीमध्ये समस्या उद्धवल्याची किंवा शेतकऱ्यांच्या विशेष सभेची माहिती/तक्रार सी.सी.आय. ला प्राप्त झालेली नाही.

(६) हे खरे नाही.

'कपास किसान' ॲपवर नोंदणीकृत आणि पडताळणी झालेल्या शेतकऱ्यांनी एम.एस.पी. गुणवत्ता मापदंडाचा आणलेला कापूस सी.सी.आय. खरेदी करते.

ज्यांचा कापूस एम.एस.पी. गुणवत्ता मापदंडाची पूर्तता करत नाही अशा शेतकऱ्यांकडून कापूस खरेदी केला जात नाही.

(७) कृषी आयुक्तालय, पुणे यांच्या दिनांक ११ डिसेंबर, २०२५ च्या परिपत्रकाद्वारे जाहीर केलेल्या प्रति हेक्टर कापसाच्या सरासरी उत्पादनाच्या (९.५८ क्विंटल प्रति एकर) आधारावर सी.सी.आय. कापूस खरेदी करत आहे. ज्या शेतकऱ्याचे उत्पादन सरासरी उत्पादनापेक्षा जास्त आहे अशा शेतकऱ्याने स्थानिक प्राधिकरणाकडून उत्पादनाचे प्रमाणपत्र घेवून सादर केल्यानंतर शेतकऱ्याचा अतिरिक्त कापूस सी.सी.आय.कडून किमान आधारभूत किंमतीने खरेदी केला जातो.

(८) हे खरे नाही.

दिनांक १ ऑक्टोबर, २०२५ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ या कालावधीत सी.सी.आय.ने महाराष्ट्रात ५९३७.८५ कोटी रुपये किंमतीचा ७४.८६ लाख क्विंटल कापूस किमान आधारभूत किंमती अंतर्गत खरेदी केला आहे. यामुळे खरेदीत कोणताही विलंब अथवा कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झालेले नाही.

(९) कपास किसान ॲपवर शेतकऱ्यांची दिनांक १ सप्टेंबर, २०२५ पासून ते दिनांक १६ जानेवारी, २०२६ पर्यंत स्व-नोंदणी करण्यात आली.

कापूस हंगाम २०२५-२०२६ साठी भारतीय कपास निगमने राज्यात एकूण १६८ कापूस खरेदी केंद्रे उघडली.

दिनांक १६ फेब्रुवारी, २०२६ अखेर ५,०२,५९८ शेतकाऱ्यांमार्फत रु.८४९७ कोटी किंमतीचा एकूण १०६.९९ लाख क्विंटल कापसाची खरेदी करण्यात आली.

सद्य:स्थितीत कापसासाठी भावांतर योजना राबविण्याचा प्रस्ताव विचाराधीन नाही.

-----------------

## ऊस उत्पादक शेतकऱ्यांची हो असलेली आर्थिक लूट रोखण्याबाबत

**(१२)** * **२६५७४ श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ऊस तोडणी हंगाम दिनांक १ नोव्हेंबर, २०२५ पासून सुरु झाला असून शेतकऱ्यांच्या शेतातील ऊस तोड करत असताना वाहतूकदार ड्रायव्हर यास प्रत्येक ट्रिपला रुपये २०० बिदागी द्यावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एक एकर ऊस तोडणीसाठी ऊस तोडणी कामगार रुपये २००० ते रुपये ५००० पर्यंत दक्षिणा या नावाखाली ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडे पैसे मागत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी एखाद्या शेतकऱ्याने पैसे द्यावयास नकार दिला तर, त्याला ऊस तोड दिली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकारास कारखान्याचे ऊस व्यवस्थापन जबाबदार असून याप्रकरणी चेअरमन, कार्यकारी संचालकांना अनेक पत्रव्यवहार करण्यात येवूनही यामध्ये कुठलाही बदल न होता शेतकऱ्यांना ड्रायव्हरला प्रती खेप रुपये २०० व एक एकरासाठी रुपये २००० ते ५००० द्यावेच लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी चेअरमन व कारखान्याचे संपूर्ण व्यवस्थापन यांना सक्त सूचना देऊन शेतकऱ्यांच्या पैशाच्या लुटीवर निर्बंध घालण्यात यावे, अशी मागणी प्रा.सुहास पाटील, सदस्य, ऊस दर नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र राज्य, सदस्य, ऊस दर नियमन दुरुस्ती समिती, महाराष्ट्र राज्य, प्रदेशाध्यक्ष, रयत क्रांती पक्ष महाराष्ट्र राज्य यांनी साखर आयुक्त, साखर संकुल, पुणे यांचेकडे दिनांक १७ नोव्हेंबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान व माहे जानेवारी, २०२६ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन ऊस उत्पादक शेतकऱ्यांची होत असलेली आर्थिक लूट रोखण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१), (२), (३) व (४) गाळप हंगाम २०२५-२०२६ मध्ये साखर आयुक्तालयाकडे अहिल्यानगर, नांदेड व सोलापूर या विभागांकडून अनुक्रमे २, २ व १ अशा एकूण ५ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी अंबालिका सहकारी साखर कारखाना, अहिल्यानगर कारखान्याबाबतच्या २ तक्रारीचे निवारण झाल्याचे साखर आयुक्त, पुणे यांनी कळविले आहे.
(५) व (६) ऊस तोडणी मजुर, मुकादम व वाहतुक कंत्राटदार यांचेकडून ऊस तोडणीकरीता पैश्यांची मागणी होत असल्यास कारवाई करणेबाबत साखर आयुक्त कार्यालयाचे दिनांक १० ऑक्टोबर, २०२५ चे परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. सदर परिपत्रकानुसार शेतकऱ्यांचे आर्थिक पिळवणुक रोखण्यासाठी सर्व कारखान्यांनी जाहीर प्रगटन करुन अशा प्रकरणातील गैरव्यवहाराला आळा बसेल असे पहावे.तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांना तक्रार करणेसाठी मोबाईल फोन/व्हॉटसअॅप क्रमांक जारी करावा व याबाबतची माहिती शेतकऱ्यांना वेळोवेळी देण्यात यावी. सदर बाबत जाहिर प्रगटनाद्वारे सर्व शेतकऱ्यांना माहिती होईल तसेच प्राप्त तक्रारींचे निवारण करणेसाठी कारखान्यांनी तक्रार निवारण अधिकारी म्हणून शेती विभागाच्या वरीष्ठ अधिकाऱ्याची नेमणूक करावी असे साखर आयुक्तालयाचे दिनांक १० ऑक्टोबर २०२५ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व क्षेत्रिय कार्यालय तसेच सर्व साखर कारखान्यांना सूचना देण्यात आले आहेत.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जलसंपदा विभागातील अधिकारी/कर्मचारी कार्यालयात अनुपस्थित राहून वेतन घेत असल्याबाबत

**(१३) * २३२८२ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल**

**(मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जलसंपदा विभागातील सुमारे ८० अभियंते व अधिकारी गेल्या सहा महिन्यांपासून प्रत्यक्ष पदावर रुजू न होता घरबसल्या लाखो रुपयांचे वेतन घेत असल्याचा धक्कादायक प्रकार माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात किती अधिकारी/कर्मचारी संबंधित आहेत, त्यांची नावे, पदे तसेच त्यांनी किती कालावधीपर्यंत कामावर अनुपस्थित राहून वेतन घेतले त्याचा तपशिल देण्यात यावा,

(३) असल्यास, सदर अधिकारी/कर्मचारी यांच्या रजा मंजूर करण्याबाबत शासनाचा नियम अस्तित्वात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर नियमांचा गैरवापर करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने ज्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे नियुक्त्या प्रलंबित असल्याचे निष्पन्न झाले आहे त्या संबंधित अधिकाऱ्यांना अदा करण्यात आलेल्या वेतनाची रक्कम वसूल करण्यात येणार आहे काय,

(५) असल्यास, उक्त उप अभियत्यांना नियुक्ती न मिळाल्याने ते हँगिंग स्थितीत असून प्रत्यक्ष पद नाही, काम नाही, जबाबदारी नाही, तथापि पगार मात्र नियमित घेत असून गेल्या सहा महिन्यांत जनतेच्या पैशातून रुपये ७ ते ८ कोटी इतकी रक्कम ८० उप अभियत्यांना शासनाने फुकट दिली आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) खरे नाही. जलसंपदा विभागातील उप अभियंता व शाखा अभियंता संवर्गातील काही अभियंते प्रशासकीय कारणास्तव पदस्थापनेविना राहिले होते. दरम्यानच्या कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाची आदर्श आचारसंहिता लागू झाली. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने पदस्थापनेविना राहिलेल्या उप अभियंत्यांना पदस्थापना देण्यात आली आहे. तसेच शाखा अभियंत्यांना देखील पदस्थापना देण्यात आली आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६)प्रश्न उद्‌भवत नाही.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांच्या संच मान्यतेतील त्रुटी दूर करण्याबाबत

**(१४) * २५८११ श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.शिवाजी पाटील (चंदगड), श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेकडो शाळांच्या संच मान्यतेमध्ये विविध त्रुटी आढळून आल्याने सदर त्रुटी दिनांक १५ जानेवारीपर्यंत दूर न केल्यास संबंधित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन रोखण्यात येईल असा इशारा संबंधित विभागामार्फत देण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २१ फेब्रुवारी, २०२५ व २६ मार्च, २०२५ रोजी निर्गमित शासन पत्रांनुसार सन २०२५–२०२६ साठीची संच मान्यता माहिती शिक्षणाधिकारी (लॉग-इन) प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात आली असून शाळांनी देण्यात आलेल्या युजर मॅन्युअलनुसार माहितीची तपासणी करून योग्य संच मान्यतेवर डिजिटल स्वाक्षरी करून ती उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संच मान्यतेसाठी लागू करण्यात आलेल्या निकषांमुळे राज्यातील हजारो शाळांना आवश्यक शिक्षक व मुख्याध्यापक उपलब्ध होणार नसल्याची स्थिती निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.

तथापि, कोणत्याही शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन बंद करण्यात आलेले नाही.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) शासन निर्णय दिनांक १५ मार्च, २०२४ मधील १ ते २० पटांच्या प्राथमिक व उच्च प्राथमिक (इयत्ता १ ते ४/५ व इयत्ता १ ते ७/८) शाळांसाठी किमान १ शिक्षकाची नियुक्ती करण्याची तरतुद त्याचप्रमाणे शासन पत्र दिनांक १० मार्च, २०२५ व दिनांक २६ मार्च, २०२५ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील प्राथमिक शाळेस पटसंख्या कमी असली तरीही शिक्षक पदे मंजूर आहेत. सबब, कोणत्याही एक वर्गातील किमान पटसंख्येपेक्षा कमी विद्यार्थी असल्यास त्या गटात विद्यार्थी संख्येनुसार पदे अनुज्ञेय केले असल्याने शिक्षक अतिरिक्त ठरत नाहीत. तथापि शासन निर्णय दिनांक १५ मार्च, २०२४ नुसार विद्यार्थी पटसंख्येअभावी शिक्षक अतिरिक्त ठरत असल्यास, अतिरिक्त शिक्षकांचे वेतन संरक्षणासह समायोजन करण्यात येते.

-----------------

## राज्यातील मराठी शाळा बंद होऊ नये यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(१५) * २४११५ श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सचिन पाटील (फलटण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली आबा कटके (शिरुर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे २ हजार शाळा विद्यार्थी पटसंख्ये अभावी बंद होण्याच्या मार्गावर असून यामुळे सुमारे २५,००० शिक्षक अतिरिक्त ठरल्याची परिस्थिती निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी कोकण विभागात सुमारे ७००, विदर्भात ८०० पेक्षा अधिक, पश्चिम महाराष्ट्रात ७०० पेक्षा अधिक, मराठवाड्यात सुमारे ४०० व उत्तर महाराष्ट्रात ३०० पेक्षा अधिक शाळा बंद होण्याच्या प्रक्रियेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, शासनाने सुमारे ६२० शाळा बंद करण्याचा निर्णय माहे डिसेंबर, २०२५ मध्ये घेतल्याने राज्यातील जवळपास ७० गावांमध्ये एकही शाळा उपलब्ध नसल्याची व 'ना शाळा, ना पाटी-पेन्सिल' अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याने तसेच मराठी शाळा बंद होऊ नयेत यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यासह विविध भागांत शिक्षक, विद्यार्थी व संस्था चालकांनी लाखोंच्या संख्येने मोर्चे काढून शासनास निवेदने दिली असल्याचे निदर्शनस आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील मराठी शाळा बंद होऊ नयेत यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) सिंधुदुर्ग जिल्ह्यात मोर्चा काढण्यात आल्याची बाब खरी आहे. कमी पटाच्या मराठी शाळांचा पट वाढविणे व मराठी शाळा टिकविणे याबाबत शासन गंभीर असून कमी पटाच्या मराठी शाळा सुरु असताना शाळांचा पट वाढविणे व मराठी शाळा टिकविणे या बाबत शाळा प्रवेशोत्सव, इयत्ता पहिली ते आठवी पर्यतच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप, प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजना, इयत्ता पहिली ते आठवीपर्यतच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, पायमोजे, बुट, निपुण महाराष्ट्र, समग्र शिक्षा अभियान, स्टार्स प्रकल्प, पीएमश्री प्रकल्प, माझी शाळा सुंदर शाळा, नियतकालिक चाचण्या, शिक्षक प्रशिक्षण उपक्रम इ. उपाययोजनांची अंमलबजावणी शासनाकडून करण्यात येत आहे.

-----------------

## साक्री (जि.धुळे) तापी नदी ते पांझर नदीच्या उगमापर्यंत नदीजोड प्रकल्प राबविण्याबाबत

**(१६) * २३७८० श्रीमती मंजुळा गावित (साक्री) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) येथील तापी नदी ते पांझर नदीच्या उगमापर्यंत नदीजोड प्रकल्प राबविण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नदीजोड प्रकल्प राबविण्यात आल्यास साक्री तालुक्यातील लहान-मोठ्या धरणांबरोबरच लघु व मध्यम प्रकल्पात पाणी साठा करणे सहज शक्य होणार असून साक्री तालुक्यासह धुळे व शिंदखेडा तालुक्यातील काही भागात पिण्याच्या पाण्याची व सिंचनाची बारमाही सोय होण्यास मदत होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
स्थानिक लोकप्रतिनिधींचे दिनांक २४ फेब्रुवारी, २०२५ रोजीचे कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांना उद्देशीत निवेदन प्राप्त आहे.
(२) नाही.
तापी खो-यातील महाराष्ट्रासाठी उपलब्ध पाण्याचे नियोजन पूर्ण झाले आहे. तापी खोऱ्यात पाणी उपलब्ध नसल्यामुळे सद्य:स्थितीत तापी नदी ते पांझरा नदीच्या उगमापर्यंत नदीजोड प्रकल्प राबविता येत नाही.
तथापि, साक्री, धुळे व शिंदखेडा तालुक्यात जलसंपदा विभागाच्या एकूण ६८ प्रकल्पांमुळे अनुक्रमे २३९६० हे., १५०९९ हे. व १४७०० हे. सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. तसेच बांधकामाधीन ८ प्रकल्पांमुळे अनुक्रमे ३४८१ हे., ६५२९ हे. व ४९६८९ हे. सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनासाठी वापरल्या जाणाऱ्या निपुण ॲपमधील तांत्रिक व भाषिक त्रुटी दूर करणेबाबत

**(१७) * २४१४८ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक क्षमतांचे मूल्यमापन करण्यासाठी वापरण्यात येत असलेल्या केंद्र शासनाच्या ‘निपुण ॲप’ मध्ये अनेक तांत्रिक अडचणी व भाषिक स्वरूपाच्या त्रुटी असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ॲपमधील मजकुरात व्याकरणाच्या अनेक चुका आढळून येत असून विद्यार्थ्यांनी अचूक उत्तर दिले असतानाही ते ॲपमधील चुकीच्या शब्दप्रयोगाशी जुळत नसल्याने विद्यार्थ्यांना सरसकट नापास घोषित करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील विविध भागांतील बोलीभाषांनुसार उच्चारांमधील नैसर्गिक भिन्नता, मुलांच्या आवाजातील चढ-उतार तसेच वाक्दोष यांचा सदर ॲपमध्ये योग्य विचार केला जात नसल्याने अनेक विद्यार्थ्यांना शून्य गुण देण्यात येत असून त्यामुळे शैक्षणिक मूल्यमापनाच्या मान्य तत्त्वांचे उल्लंघन होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, चाचणी दरम्यान आजूबाजूचा थोडाही आवाजा आला तरीही विद्यार्थ्याने वाचलेला मजकूर ॲपद्वारे स्वीकारला जात नसल्याने शिक्षकांना वारंवार चाचण्या घ्याव्या लागत आहेत आणि यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने 'निपुण ॲप' मधील तांत्रिक व भाषिक त्रुटी दूर करून विद्यार्थ्यांचे न्याय्य मूल्यमापन सुनिश्चित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे अंशत खरे आहे.
काही ठिकाणी अत्यल्प स्वरुपात शिक्षकांना लॉगीन करताना तांत्रिक अडचणी दिसून आल्या असता, त्याचे तात्काळ निराकरण करण्यात आले आहे.तसेच, निपुण ॲपमध्ये भााषिक त्रुटी निदर्शनास आलेल्या नाहीत.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) निपुण महाराष्ट्र ॲपव्दारे घेण्यात येणारी चाचणी निदानात्मक आहे. या चाचणीत गुणदान केले जात नाही. तसेच बोली भाषा, उच्चारातील नैसर्गिक फरक व आवाजातील चढ-उतार यांचा विचार करुन २०% पर्यंत चुकीचा उच्चार स्वीकारला जातो. मजकुराचे वाचन अचूक होत आहे याची पडताळणी करण्यात येते. शिक्षकांना वेळोवेळी उद्भवणाऱ्या शंका/अडचणींचे निरसन पर्यवेक्षीय यंत्रणेमार्फत व तज्ञांमार्फत सातत्याने करण्यात येते. तसेच निपुण ॲपमध्ये Noise Cancellation तंत्रज्ञान समाविष्ट असल्याने वर्गामध्ये पूर्ण शांतता नसली, तरीही विद्यार्थ्यांचे वाचन अचुकपणे नोंदविले जाते व पार्श्वभूमीचा आवाज असला तरी चाचणी अमान्य ठरत नाही.

-----------------

## राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना वितरित केलेल्या कर्जाच्या विनियोगात गैरप्रकार झाल्याबाबत

**(१८) * २६८९३ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना बळकटी देण्यासाठी राष्ट्रीय सहकार विकास निगमने शासनामार्फत वितरित केलेल्या कर्जाच्या विनियोगात गंभीर गैरप्रकार झाल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील ३० साखर कारखान्यांपैकी २४ कारखान्यांनी राष्ट्रीय सहकार निवास निगमने दिलेल्या कर्जाच्या वापराच्या अटी, शर्तीचे उल्लंघन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासाठी साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची सखोल चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, सदर चौकशीच्या अनुषंगाने कर्जाच्या विनियोगात गैरप्रकार करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.
• राष्ट्रीय सहकार विकास निगमच्या अधिकाऱ्यांनी ३० कारखान्यांना भेटी देऊन त्यांचा अहवाल पत्र दिनांक ०४ सप्टेंबर, २०२५ व दिनांक ८ ऑक्टोबर, २०२५ नुसार शासनास सादर केला आहे.

• सदर अहवालानुसार २१ कारखान्यांच्या विनियोगात गंभीर स्वरूपाचे उल्लंघन, ३ कारखान्यांच्या बाबतीत मध्यम स्वरूपाचे उल्लंघन तसेच ६ कारखान्यांच्या विनियोगात किरकोळ उल्लंघन दिसून आले असल्याचे नमूद केले आहे.

• राष्ट्रीय सहकार विकास निगम यांनी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना दिलेल्या कर्जाचा साखर कारखान्यांनी केलेला विनियोग तपासून कर्जाच्या विनियोगात उल्लंघन केलेल्या सहकारी साखर कारखान्यांबाबत तपासणी करून शासनास शिफारस करण्यासाठी साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दिनांक ०६ जानेवारी, २०२६ अन्वये समिती गठीत करण्यात आली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) समितीने कारखान्यांना भेटी देऊन याबाबत माहिती घेतली असून लवकरच शासनास अहवाल सादर करण्यात येणार आहे.

(५) समितीने अद्याप अहवाल सादर केला नाही.

(६) लागू नाही.

-----------------

## काजळी सहकारी सामुदायिक शेती संस्था मर्या. (ता. तलासरी, जि. पालघर) या संस्थेच्या जमिनीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१९) * २३४६० श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काजळी सहकारी सामुदायिक शेती संस्था मर्या. (ता.तलासरी, जि.पालघर) या संस्थेची (सर्व्हे क्र.७२ (क) (५) मधील २०-२७-०० हेक्टर आर चौरस मीटरची) रुपये ७.०० कोटी इतक्या रकमेची जमीन केवळ रुपये ७०.०० लाख रुपयांत खाजगी विकासकास विक्री करुन संस्थेचे कोट्यवधी रुपयांचे आर्थिक नुकसान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जमीनीचा व्यवहार काजळी सहकारी सामुदायिक संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष, उपाध्यक्ष व अन्य पदाधिकाऱ्यांनी मिळून कोणतीही मासिक सभा, पूर्व मंजुरी मान्यता न घेता परस्पर विक्री व्यवहार केल्याचे संस्थेच्या सन २०१६-१७ ते २०२२-२३ या कालावधीतील लेखापरिक्षण अहवालातून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी तत्कालीन सहाय्यक निबंधक श्री.अजय गुजराथी आणि अवसायक श्री.उमाकांत नानाजी चेटूले यांनी आपल्या पदाचा गैरवापर करुन स्वत:च्या फायद्यासाठी जमिनीचे विक्री दस्त करुन दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, श्री.सतिश नागटिळक २ रे लेखापरिक्षक श्रेणी-२ अधिन जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था, पालघर यांनी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, डहाणू (ता.डहाणू, जि.पालघर) यांच्याकडे विनिर्दिष्ट अहवाल सादर केला असून त्यानुसार सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांनी दिनांक ११ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्या दरम्यान एफआयआर (FIR) करण्यास पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर जिल्हा विशेष लेखापरीक्षक आणि व्यापारी बँकेने पोलीस प्रशासनाकडे तक्रार दाखल करुन ४ महिने झाले असतांनाही अद्याप पोलीसांकडून एफआयआर (FIR) दाखल करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणांची सखोल चौकशी केली आहे काय, सदर चौकशीच्या अनुषंगाने संबंधित प्रकरणात

दोषी असलेले अध्यक्ष, उपाध्यक्ष व तत्कालीन संचालक मंडळ, अवसायक व तत्कालीन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, डहाणू यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करुन त्यांच्या मालमत्तेची चौकशी करणेबाबत व संस्थेची बेकायदेशीररित्या विकलेली कोट्यवधी रुपयांची जमीन शासनाच्या ताब्यात घेऊन ती पुन्हा संस्थेच्या मालकीची करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) होय.

सदर बाब काजळी सहकारी सामुदयिक शेती संस्था मर्या. (अवसायनात) ता.तलासरी जि.पालघर या संस्थेच्या सन २०१६-१७ ते २०२२-२३ या मुदतीचे वैधानिक लेखापरिक्षण अहवाल, दिनांक २२ जुलै, २०२५ व विनिर्दिष्ट लेखापरिक्षण अहवाल, दिनांक २८ जुलै, २०२५ नुसार निदर्शनास आली आहे.
(२) लेखापरिक्षक श्रेणी-२ अधिन जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था,पालघर यांनी काजळी सहकारी सामुदयिक शेती संस्था मर्या. (अवसायनात) ता.तलासरी, जि.पालघर या संस्थेच्या सन २०१६-१७ ते २०२२-२३ या मुदतीचे वैधानिक लेखापरिक्षण अहवाल, दिनांक २२ जुलै, २०२५ व विनिर्दिष्ट लेखापरिक्षण अहवाल, दिनांक २८ जुलै, २०२५ रोजी सहायक निबंधक, सहकारी संस्था, डहाणू यांचे कार्यालयास सादर केला होता.

सदर अहवालातून संस्थेच्या जमिनीची इंडेक्स (सुची) २ नुसार रु.६,३९,२७,१००/- इतकी किंमत असताना ७०.०० लाख इतक्या किंमतीत संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष, उपाध्यक्ष व अन्य पदाधिकाऱ्यांनी कोणतीही मासिक सभा, पूर्व मंजूरी न घेता परस्पर विक्री व्यवहार केल्याचे निर्दशनास आले आहे.
(३) लेखापरिक्षक श्रेणी-२ अधिन जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था, पालघर यांनी सादर केलेल्या सन २०१६-१७ ते २०२२-२३ या कालावधीचे (अवसायन) विनिर्दिष्ट लेखापरिक्षण अहवालानुसार, श्री.अजय गुजराथी, तत्कालीन सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, डहाणू व श्री. उमाकांत नानाजी चेटूले अवसायक तथा सहकार अधिकारी श्रेणी-१ डहाणू (सेवानिवृत्त) यांच्यावर पदाचा गैरवापर करुन विक्री दस्त करुन दिल्याचा ठपका ठेवण्यात आलेला आहे.
(४) व (५) हे खरे आहे.

काजळी सामुदायिक शेती सहकारी संस्था मर्या., तलासरी, जि.पालघर (अवसायन) या संस्थेच्या विनिर्दिष्ट लेखापरिक्षण अहवालानुसार संस्थेच्या जमिन विक्री प्रकरणात दोषीविरुद्ध, लेखापरिक्षक श्रेणी-२, पालघर यांनी पोलीस स्टेशन, तलासरी येथे दिनांक ११ ऑगस्ट, २०२५ रोजी फिर्याद अर्ज दाखल केलेला आहे. परंतु, अद्याप पर्यत मा.पोलीस निरीक्षक, तलासरी यांनी सदर प्रकरणांत FIR दाखल केलेला नाही.
(६) संबधित दोषी व्यक्तींवर आर्थिक नुकसानाची जबाबदारी निश्चित करुन त्याची वसुली करण्याचे अनुषंगाने सहायक निबंधक, सहकारी संस्था, डहाणू,जि. पालघर या कार्यालयाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ नुसार, दिनांक १५ जानेवारी, २०२६ अन्वये प्राधिकृत चौकशी अधिकारी नियुक्त केले असून चौकशीची कार्यवाही सुरू आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पनवेल (जि. रायगड) येथील रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ व डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संकुल प्रकल्प सुरु करण्याबाबत**

**(२०) * २३१२५ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व),**

**श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) येथील रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ व डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संकुल प्रकल्प हा रायगड आणि ठाणे जिल्ह्यातील तरुणांना औद्योगिक क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी उभारला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पाचे भूमिपूजन दिनांक २७ मार्च, २०२३ रोजी वा त्यादरम्यान झाले असून सदर प्रकल्पाचे बांधकाम दिनांक १ मे, २०२३ रोजीपासून सुरू करून माहे जुलै, २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पासाठी सर्व आवश्यक परवानग्या, आर्थिक मंजुरी व आंतरराष्ट्रीय साह्य मिळाल्यानंतरही प्रत्यक्ष काम सुरू न झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रलंबित प्रकल्पाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रलंबित प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र भूषण डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पनवेल याद्वारे औद्योगिक प्रशिक्षण देण्याचे कामकाज सुरु असून या संस्थेचे बळाकटीकरण करण्याचे काम सुरु आहे. त्याचप्रमाणे राज्यातील युवक-युवतींना एकात्मिक आणि समग्र स्वरूपाचे कौशल्य प्रशिक्षण देण्याकरिता तसेच त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यताप्राप्त कौशल्याधारित उच्च शिक्षणाद्वारे रोजगारक्षम करुन रोजगार/ स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी, राज्यात रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्यात आले आहे. रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या मुख्यालयासाठी, महाराष्ट्र भूषण डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पनवेल येथे उपलब्ध झालेल्या जागेवर महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाचे मुख्यालयाचे बांधकाम सुरु आहे. त्यामुळे राज्यातील तरुणांकरीता औद्योगिक प्रशिक्षण, उच्च शिक्षण, कौशल्य शिक्षण या परस्परपुरक शिक्षणाकरीता संयुक्त संकुल प्रकल्प उभारला जात आहे.

(२) हे अंशत: खरे आहे, उक्त प्रकल्पाचे भूमिपूजन झाले आहे. तथापि, नमूद आश्वासन आढळून आले नाही.

(३) हे खरे नाही.

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ व महाराष्ट्र भुषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था पनवेलच्या संयुक्त संकुल इमारत बांधकामाकरीता, सार्वजनिक बांधकाम विभाग ही कार्यान्वयीन यंत्रणा असून संयुक्त संकुल बांधकाम प्रकल्पाचे प्रत्यक्ष बांधकाम सुरु झालेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्यातील पात्र लाभार्थी पोषण आहारापासून वंचित असल्याबाबत

**(२१) * २३१४३ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्यातील सर्व पात्र शाळांतील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनाचे वाटप झाल्यानंतर दैनंदिन लाभार्थी विद्यार्थ्यांची उपस्थिती व संख्या 'सरल' या ऑनलाइन प्रणालीवर भरणे अनिवार्य करण्यात आले आहे, तथापि प्रत्यक्षात अनेक शाळांकडून ही माहिती नियमितपणे व वेळेत भरली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या त्रुटींमुळे केंद्र शासनाच्या मॉनिटरिंग प्रणालीत राज्यातील काही लाभार्थी विद्यार्थी पोषण आहारापासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षण संचालकांच्या सूचनेनुसार दुपारी २ वाजेपर्यंत मोबाइल ॲप/वेब पोर्टल/एमएसएमएसद्वारे दैनंदिन लाभार्थी उपस्थिती न भरल्यास संबंधित शाळा, शाळाप्रमुख व क्षेत्रीय अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करण्याबाबत दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी सुरू आहे काय तसेच सद्य:स्थितीत राज्यातील किती शाळांकडून ही माहिती नियमितपणे भरली जात असल्याचा तपशील शासनास सादर केला आहे काय,

(५) असल्यास, दैनंदिन लाभार्थी उपस्थितीची माहिती वेळेत व अचूकपणे भरण्यासाठी शाळांना आवश्यक तांत्रिक सुविधा, इंटरनेट कनेक्टिव्हिटी व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्यातील सर्व पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांना पोषण आहाराचा लाभ देण्यात येत असून कोणताही विद्यार्थी पोषण आहाराच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) शिक्षण संचालक (प्राथ.), पुणे यांनी दिनांक १६ डिसेंबर, २०२५ च्या पत्रान्वये सर्व शाळांनी दररोज दु.०२.०० वाजेपर्यंत दैनंदिन लाभार्थी विद्यार्थ्यांची नोंद पोर्टलवर करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. राज्यातील एकूण शाळांपैकी ९० टक्के ते ९३ टक्के शाळांकडून नियमितपणे ऑनलाईन माहिती पोर्टलवर भरली जाते. परंतु काही दुर्गम भागातील शाळांकडून इंटरनेट कनेक्टिव्हीटीच्या अभावी संबंधित विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ दिला जात असतानाही माहिती भरण्यास अडचण निर्माण होते. अशी अडचण निर्माण झालेल्या शाळांना दरवर्षी मागील माहिती भरण्याकरिता सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते.

(५) सन २०२५-२६ यु-डायस प्लस प्रणालीमधील माहितीनुसार राज्यातील ६४,४७९ शासकीय शाळांपैकी ४४,०८७ (६८.३७%) शाळांमध्ये इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे. राज्य शासनामार्फत १,११५ ग्रामीण भागातील शासकीय माध्यमिक शाळांमध्ये भारत संचार निगम लिमिटेड, मुंबई कार्यालयामार्फत इंटरनेट सुविधा शाळांमध्ये उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे. सद्य:स्थितीमध्ये भारत संचार निगम लिमिटेड, मुंबई यांच्याकडून २८ शाळांमध्ये इंटरनेट सुविधा उपलब्ध करून दिली आहे. उर्वरित शाळांमध्ये इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही सुरू आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील शाळांमध्ये बनावट कागदपत्रांच्या आधारे अनुदानात झालेला गैरव्यवहार

**(२२)** * **२३०२९ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील भवानी माता उच्च प्राथमिक शाळा भारतवाडा, एन. एस. व्ही. एम. फुलवारी प्राथमिक शाळा मराठी व हिंदी वैशालीनगर, संत गीतामाता प्राथमिक शाळा भारतवाडा, माँ भवानी हिंदी प्राथमिक शाळा, स्व. श्यामरावजी देशमुख प्राथमिक शाळा हिंगणा, काश्मीर विद्या मंदिर विनोबा भावेनगर, गुरुप्रसाद प्राथमिक शाळा, वाडी, शांतीनिकेतन प्राथमिक शाळा राजीव गांधी नगर, अमित उच्च प्राथमिक शाळा नरशाळा, श्रीमती भगवातीदेवी चौधरी सोनेगाव, गजानन उच्च प्राथमिक शाळा (सर्वश्रीनगर) या शाळेतील संस्थाचालक व शिक्षकांनी शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांशी संगनमत करून बनावट कागदपत्रांच्या आधारे सुमारे तीन कोटी रुपये किंवा त्याहून अधिक रकमेचा अनुदान घोटाळा केल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित संस्थाचालक, शिक्षक तसेच अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.

नागपूर जिल्ह्यातील एकुण १२ शाळांना शासन निर्णय दिनांक २१ ऑक्टोबर २०१३, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१३ व दिनांक ०१ मार्च, २०१४ अन्वये प्रथमत: २० टक्के टप्पा वाढ अनुदानास पात्र करण्यात आले होते.

सदर शाळांना शासन निर्णय दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१७ च्या शासन निर्णयानुसार सप्टेंबर, २०१६ पासून टप्पा वाढीचे अनुदान वितरित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या.

परंतु, सदर शाळांना प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अनुदान वितरणासंबंधी ज्ञापन क्र.४, दिनांक १८ सप्टेंबर, २०१४ मध्ये फेरफार करून सन २०१४ पासून नियमबाह्यरित्या प्रत्यक्ष अनुदान वितरणाची कार्यवाही करण्यात आल्याची बाब सन २०१७ साली निदर्शनास आली.
(२) व (३) सदर अनियमिततेस जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द दिनांक १७ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय चौकशी सुरू केली आहे. याप्रकरणी विभागीय चौकशीअंती दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्याविरूध्द शिक्षेचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून, विभागीय चौकशीची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

तसेच, याप्रकरणी संबंधित शाळांतील कर्मचारी / पदाधिकारी यांचेसह दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्याविरूध्द पोलीस स्टेशन नागपूर शहर येथे गु.र.क्र.९६६/२०२५ दाखल केलेला आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी यांच्या कार्यालयात लाच घेतल्याबाबत

**(२३) * २३१९५ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी श्री.अमित रंजन यांच्या कार्यालयात लाचेची मागणी केल्याने सिंचन विभागाचे उपअभियंता श्री.त्रिलोक त्रिपाठी आणि खाजगी कंपनीचा इंजिनिअर श्री.कामेश डुल्ला या दोघांना अटक केल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) नाही.

श्री.अमित रंजन, सहायक जिल्हाधिकारी तथा एकात्मिक प्रकल्प अधिकारी, पांढरकवडा यांनी पोलिस स्टेशन, पांढरकवडा येथे दिलेल्या फिर्यादी वरून सदर प्रकरणी श्री. त्रिलोक त्रिपाठी उप अभियंता आणि खासगी कंपनीचा इंजिनियर श्री. कामेश डुल्ला यांचेविरूध्द दिनांक ०८ जानेवारी, २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे, मात्र अटक केलेली नाही.

(२) व (३) उप विभागीय पोलिस अधिकारी, उपविभाग वणी चार्ज पांढरकवडा यांनी दिनांक ०८ जानेवारी, २०२६ रोजी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे. सदर प्रकरणी पोलीस अधिकचा तपास करत आहेत. तसेच कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर यांनी दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२६ रोजी शासनास सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी करण्यात आली आहे. त्यानुषंगाने मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांचेकडून दिनांक १७ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये अतिरिक्त माहिती मागविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## मुंबई उपनगरातील कांदिवली येथील ठाकूर विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाकडून ओळखपत्रासाठी मुंबई विद्यापीठाच्या नियमांविरुद्ध अतिरिक्त शुल्क आकारल्याबाबत

**(२४) * २३३१८ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील कांदिवली येथील ठाकूर विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या प्रशासनाने दिनांक ७ जानेवारी, २०२६ रोजी स्वतंत्र परिपत्रक काढून ओळखपत्राची नक्कल प्रत (Duplicate Identity Card) उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्यक्षात मुंबई विद्यापीठाच्या सन २०१८ च्या परिपत्रकानुसार निर्धारित रुपये ५०

इतक्या शुल्काऐवजी तब्बल रुपये १,००० इतके शुल्क आकारले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शुल्क वेळेत न भरल्यास रुपये ५०० ते ५,००० इतका दंड आकारण्याचा निर्णयही महाविद्यालय प्रशासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई विद्यापीठाच्या स्पष्ट निर्देशांचे उल्लंघन करून अवाजवी व नियमबाह्य अतिरिक्त शुल्क आकारले जात असल्याने याबाबत विद्यार्थ्यांकडून तक्रारी करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यासह विद्यार्थ्यांवर होणारा आर्थिक भार कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
सदर महाविद्यालयाने कोणत्याही विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त शुल्क आकारणी केलेली नाही.
(२) हे खरे नाही.
सदर उपप्रश्नामध्ये नमूद दंडाची रक्कम ही विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रवेश नोंदणी अर्ज हे विहित कालावधीमध्ये जमा न केल्यासंदर्भातील आहे.
(३) अंशत: खरे आहे.
एका विद्यार्थी संघटनेकडून याबाबतची तक्रार मुंबई विद्यापीठास प्राप्त झाली आहे.
(४) या संदर्भात मुंबई विद्यापीठामार्फत संबंधित महाविद्यालयाकडून लेखी खुलासा मागविण्यात आला आहे.
(५) महाविद्यालयाने कोणत्याही विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त शुल्क आकारणी केलेली नाही. सबब, प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बेदाणा उत्पादनास प्रोत्साहन देऊन निर्यात वाढविण्याबाबत

**(२५) * २४७११ श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नैसर्गिक आपत्तीमुळे बेदाणा उत्पादनाचे नुकसान झाले असून सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात माहे नोव्हेंबर, २०२५ पर्यंत बेदाण्याची निर्यात ४२,७१६ (मागील वर्षाच्या) टनांवरून केवळ ७,९२४.९९ टनांपर्यंत खाली आल्याचे (८१.४५ टक्के घट) माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात दरवर्षी २.५० लाख टन होणारा बेदाणा उत्पादन यावर्षी केवळ १.५० लाख टनांवर आल्याने आणि निर्यातीत घट झाल्याने राज्याला मिळणाऱ्या परकीय चलनात सुमारे ४१४ कोटी १ लाख रुपयांची मोठी तूट निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सांगली जिल्ह्यासह राज्यातील द्राक्ष उत्पादकांचे अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाले आहे, त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी आपल्या द्राक्ष बागा काढून टाकल्याने भविष्यात बेदाणा उत्पादनावर व निर्यातीवर त्याचा

अधिक विपरित परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त चौकशीच्या अनुषंगाने बेदाणा उत्पादनात वाढ होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सांगली यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार सांगली जिल्हयात माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये २.१७ हेक्टर आर क्षेत्रावरील द्राक्ष बागांचे तर माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये २०,६२५.९३ हेक्टर क्षेत्रावरील बागांचे अतिवृष्टीमुळे नुकसान झाले आहे. सदरच्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या द्राक्ष बागांचे पंचनामे केलेले असून अतिवृष्टी नुकसानीबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात आलेला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील साखर कारखान्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांची एफआरपी (उचित लाभकारी मूल्य) रक्कम थकविल्याबाबत

**(२६) * २३८२१ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील साखर हंगाम सुरु होऊन एक कोटीहून अधिक टन ऊसाचे गाळप झाले असतांना गाळप सुरु केलेल्या २६३ साखर कारखान्यांपैकी २२९ साखर कारखान्यांनी एफआरपी (उचित लाभकारी मुल्य) रुपये २००० कोटीहून अधिक रक्कम शेतकऱ्यांची थकवली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांना त्यांच्या ऊसास केंद्र शासनाच्या व कायद्यातील तरतूदीनुसार एफआरपी (FRP) मूल्य देणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्या २२९ साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांना ऊसाचे मूल्य एफआरपी (FRP) प्रमाणे दिले नाही त्यांना तात्काळ देण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) व (२) हंगाम सन २०२५-२६ मध्ये राज्यातील २०६ साखर कारखान्यांनी गाळप घेतलेले असून दिनांक १५ फेब्रुवारी, २०२६ अखेरच्या अहवालानुसार राज्यात दिनांक ३१ जानेवारी, २०२६ अखेर ८७०.११ लाख मे.टन ऊसाचे गाळप झाले आहे. कारखान्यांची देय एफआरपी रु. ३३६९७ कोटी असून कारखान्यांनी रु. २९०९६ कोटी एफआरपी अदायगी केली आहे. तर, रु. ४६०१ कोटी रक्कम थकीत आहे. एफआरपी अदायगीचे प्रमाण ८६.३४% व थकीत एफआरपीचे प्रमाण रु. १३.६६ % आहे. ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ चे कलम ३ (३) मधील तरतुदीनुसार हंगामामध्ये गाळप केलेल्या ऊसाचे १४ दिवसात किमान एफआरपी प्रमाणे ऊस किंमत ऊस पुरवठादारांना अदा करणे प्रत्येक कारखान्यांना बंधनकारक आहे. तसेच विहित कालावधीत एफआरपी देयके अदा न केल्यास कलम ३(३A) अनुसार विलंब कालावधी करीता १५% व्याज आकारण्याची तरतूद आहे.
(३) ऊस (नियंत्रण), आदेश १९६६ चे कलम ३(३) मधील तरतूदीनुसार विहीत मुदतीमध्ये एफआरपी अदा न करणाऱ्या साखर कारखान्यांची संबंधित प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांच्या स्तरावर सुनावणी चालु आहे.

६०% च्या खाली एफआरपी अदायगी केलेल्या एकूण ४५ साखर कारखान्यांची साखर आयुक्तालयामार्फत दिनांक १७ फेब्रुवारी, २०२६ व दिनांक १८ फेब्रुवारी, २०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली आहे. सदर कारखान्यांचे म्हणणे ऐकून घेऊन सदरहु कारखान्यांना दिनांक १० मार्च, २०२६ व दिनांक ११ मार्च, २०२६ रोजी पुनश्च सुनावणीसाठी हजर राहणेबाबत कळविण्यात आले आहे. सुनावणीत गैरहजर असणाऱ्या ६ साखर कारखान्यांना दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ रोजी सुनावणीसाठी हजर राहणेबाबत कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत**

**(२७) * २३०४६ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.अमोल खताळ (संगमनेर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील राष्ट्रीय कृषि सहकारी विपणन महासंघ (नाफेड) आणि राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघ (NCCF) या संस्थांनी माहे जून ते ऑगस्ट, २०२५ मध्ये मोठ्या प्रमाणात कांद्याची खरेदी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या शेतकरी बांधवानी नाफेड व एनसीसीएफ या संस्थांना कांदा विक्री केलेली आहे त्या शेतकरी बांधवांना रुपये २०० कोटी अदा करणे बाकी असल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी नाशिक जिल्हयातील नाफेड कार्यालयाबाहेर सलग दोन तास 'ठिय्या' आंदोलन केल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र सरकारच्या किंमत स्थिरीकरण निधी योजनेंतर्गत नाफेडमार्फत खरेदी करण्यात आलेल्या कांदयाची रक्कम नियमानुसार ठराविक कालावधीत देणे अपेक्षित असताना देखील अनेक शेतकऱ्यांना दीर्घ कालावधीनंतरही रक्कम न मिळाल्यामुळे उपरोक्त आंदोलन करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, राज्यात यंदा अतिवृष्टीने गावरान कांदयासह खरीप, लेट खरीपातील लाल कांदयाला निर्यातबंदी, कीड-रोग, खते, बियाणे, मशागत खर्चात झालेली वाढ व कमी झालेले उत्पादन तसेच उत्पादित कांदयास मिळत असलेला अत्यल्प दर यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्यातील कांद्याला रुपये ३५ एवढा हमीभाव मिळावा या व इतर मागण्यांसाठी शेतकरी आक्रोश कृती समितीतर्फे मौ.कानगाव (ता.दौंड, जि.पुणे) येथून दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ रोजीपासून धरणे आंदोलन करुन बेमुदत उपोषण, चक्रीय उपोषण, मार्केट बंद आंदोलन, रास्ता रोको, रेल्वे रोको, बोंबाबोंब आंदोलन अशी विविध प्रकारची आंदोलने मागण्या मान्य होईपर्यंत करण्यात येणार असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, कांदयावरची निर्यातबंदी उठविण्यासाठी राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी शासनाकडे वारंवार मागणी केली असून कांदा उत्पादनाला प्रती हेक्टरी येणारा खर्च विचारात घेऊन शेतकऱ्यांचा कांदा किमान

३ हजार ५०० रुपये क्विंटल या दराने खरेदी करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला आहे काय,
(७) असल्यास, "बाजारात कांद्याचे दर टिकून रहावे व त्याचा फायदा राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना व्हावा यासाठी केंद्र सरकारने कांदा निर्यातीला प्रोत्साहन देऊन निर्यात अनुदान दुप्पट करावे" अशी मागणी राज्य शासनाने केंद्र सरकारकडे केली असल्याचे पणन मंत्री यांनी सांगितले हे ही खरे आहे काय,
(८) असल्यास, उक्त प्रकरणी कांदयाला योग्य दर मिळण्याच्यादृष्टीने व नाफेडमार्फत खरेदी करण्यात आलेल्या कांदयाची रक्कम शेतकऱ्यांना देण्याबाबत तसेच केंद्र सरकारने कांदा निर्यातीला प्रोत्साहन देऊन निर्यात अनुदान दुप्पट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

नाशिक जिल्ह्यातील नाफेड कार्यालयासमोर शेतकऱ्यांनी दिनांक ०५ जानेवारी, २०२६ रोजी आंदोलन केले होते. एनसीसीएफ, नाशिक या केंद्रस्तरीय नोडल संस्थेकडील शेतकऱ्यांची प्रलंबित देयके रुपये २०.०० कोटी रुपये रक्कमेची होती. सदर देयके वितरीत करण्याची एनसीसीएफ यांच्या स्तरावरून कार्यवाही सुरू आहे.
(३) हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या किंमत स्थिरीकरण निधी योजनेतील मार्गदर्शक अटी व शर्तींनुसार बहुतांश कांदा उत्पादक शेतकऱ्यांची देयके निर्धारित वेळेत वितरीत करण्यात आली आहेत. काही शेतकऱ्यांची प्रशासकीय प्रक्रीयात्मक कारणास्तव देयके अदा होऊ शकली नाही. त्याबाबतची एनसीसीएफ, नाशिक यांच्यास्तरावरून कार्यवाही सुरू आहे.
(४) व (५) हे खरे आहे.

कृषि विभागाकडून प्राप्त आकडेवारीनुसार खरीप व लेट खरीप हंगाम कालावधीत राज्यामध्ये अतिपाऊस झाल्याने कांदा लागवड क्षेत्र मोठ्याप्रमाणात बाधित झाले असून त्याचा उत्पादनावर परिणाम झाल्याचे आढळून आले आहे.केंद्र सरकारच्या किंमत स्थिरता निधी योजनेंतर्गत नाफेड व एनसीसीएफ या संस्थांच्या माध्यमातून कांदा उत्पादक शेतक-यांकडून कांदा खरेदी केला जातो.
(६) हे अंशत: खरे आहे.

कांदा हे नाशवंत पिक असल्याने हमीभाव योजनेत कांदा पिकाचा समावेश करण्यात आलेला नाही. राज्यातील शेतकऱ्यांचे हित विचारात घेऊन कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द करण्यासंदर्भात केंद्रीय वाणिज्य मंत्र्यांना दिनांक ०४ मार्च, २०२५ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आली होती. राज्य शासनाच्यावतीने सातत्याने केलेल्या पाठपूराव्यामुळे केंद्र शासनाने दिनांक २२ मार्च, २०२५ च्या अधिसूचनेन्वये कांदा निर्यातीवरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द केले आहे.
(७) हे खरे आहे.

कांद्याच्या दरात होणाऱ्या घसरणीवर तातडीची उपाययोजना करण्यासाठी केंद्रीय ग्राहक संरक्षण विभागास कांदा निर्यातदार शेतकऱ्यांना रोडटेप RoDTEP (Remission of Duties and Taxes on Export Products Scheme) योजनेंतर्गत देण्यात येणारे अनुदान १.९ टक्क्यांवरुन ४ टक्यांपर्यंत वाढविण्यासंदर्भात मा.मुख्यमंत्री यांच्या स्तरावरुन दिनांक १० ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये केंद्रशासनास विनंती करण्यात आली आहे.
(८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील इयत्ता अकरावी प्रवेश प्रक्रिया धोरणात सुधारणा करणेबाबत**

**(२८) * २३४८३ श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी एकूण ९,५४८ कनिष्ठ व उच्च माध्यमिक विद्यालये/महाविद्यालये उपलब्ध असताना, त्यापैकी तब्बल १,११८ कनिष्ठ व उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये एकाही विद्यार्थ्याने प्रवेश न घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रवेश प्रक्रियेच्या तब्बल दहा फेऱ्या पूर्ण होऊनही राज्यभरात ८,२१,८४६ जागा अद्याप विद्यार्थ्यांनी प्रवेश न घेतल्यामुळे रिक्त राहिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थी संख्या व प्रत्यक्ष गरजेपेक्षा अधिक महाविद्यालये, तुकड्या व अभ्यासक्रमांना शासनाकडून मंजुरी देण्यात आल्यामुळे मोठ्या प्रमाणावर जागा रिक्त राहत असून त्यातून शासनावर अनावश्यक आर्थिक बोजा पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, इयत्ता अकरावी प्रवेश प्रक्रियेचा सखोल अभ्यास करून भविष्यात विद्यार्थी संख्या लक्षात घेऊन महाविद्यालये, तुकड्या व अभ्यासक्रमांना मंजुरी देणे, रिक्त जागांचे प्रमाण कमी करणे तसेच शासनावर होणारा आर्थिक भार टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये इयता १० वीत १४,५०,४३३ विद्यार्थी उत्तिर्ण झाले आहेत, त्यातील इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत राज्यातील एकूण १३,५०,२४७ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले आहे.तसेच उर्वरीत विद्यार्थी शेतकी शाखा,पॉलीटेक्नीक व व्यवसायिक शिक्षणाच्या शाळांमध्ये प्रवेश घेत असतात.

(३) हे खरे नाही. सन २०१२ पासून शासनाने स्वयंअर्थसहाय्यीत धोरण लागू केल्याने तेव्हा पासून मंजूर झालेले नविन कमवि/उच्च माध्यमिक शाळा, इयत्ता ११ वी /१२ वी अतिरिक्त शाखा तुकडी व इयत्ता ११ वी व १२ वी दर्जावाढ प्रस्ताव हे स्वयंअर्थसहाय्यीत तत्वावर मंजूर करण्यात येत आहेत.तसेच अनुदानित अथवा अंशत: अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयातील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यात येते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या सेंट्रल व्हेइकल वर्कशॉप कर्मचारी सहकारी पतपेढीमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(२९) * २७३३१ श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या कर्मचाऱ्यांनी सेंट्रल व्हेईकल वर्कशॉप कर्मचारी सहकारी पतपेढीच्या सन २००७ ते २०२२ या कालावधीतील लेखापरीक्षण अहवालातून सदर पतपेढीमध्ये रुपये ४ कोटी ४१ लाख इतक्या

रकमेचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विशेष लेखापरीक्षक यांनी सदर आर्थिक गैरव्यवहाराबाबत उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे शहर -३ यांना अहवाल सादर केला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने लेखापरीक्षकांनी पिंपरी-चिंचवड पोलिसांना दिनांक १७ फेब्रुवारी, २००५ रोजी वा त्यादरम्यान एफ.आय.आर (FIR) दाखल करण्याबाबत पत्र दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सेंट्रल व्हेईकल वर्कशॉप कर्मचारी सहकारी पतपेढीत आर्थिक गैरव्यवहार उघड झाल्याने ठेवीदारांचे मोठे आर्थिक नुकसान होऊन सदर रक्कम परत मिळण्यासाठी अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, लेखापरीक्षकांनी उक्त प्रकरणाबाबत एफ. आय. आर (FIR) दाखल करुन सात महिने झाले असतानाही पोलिसांनी अद्याप एफ.आय.आर (FIR) दाखल केली नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित तत्कालीन अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार आणि व्यवस्थापकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) विशेष लेखापरीक्षक यांनी सादर केलेल्या विर्निदिष्ट अहवालाच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर यांनी विशेष लेखापरिक्षक यांना दि. १४ फेब्रुवारी, २०२५ रोजी पत्र देऊन सदर प्रकरणी एफ.आय.आर.दाखल करण्यासाठी प्राधिकृत केले आहे.
तसेच जिल्हा उपनिबंधक, पुणे शहर यांनी दिनांक २२ जुलै, २०२५ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकरणी आर्थिक अपहाराच्या अनुषंगाने तात्काळ गुन्हा नोंद करण्यात यावा अशी विनंती पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांना केली आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) हे खरे नाही. सदर प्रकरणी चिंचवड पोलीस ठाणे येथे दिनांक १० नोव्हेंबर २०२५ रोजी प्रथम माहिती अहवाल (एफ.आय.आर.) दाखल झाला आहे.
(६) प्रस्तुत प्रकरणी प्रथम माहिती अहवाल (एफ.आय आर.) दाखल झाला असून पुढील कार्यवाही पोलीस विभागाकडून सुरू आहे. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये संबंधितांवर आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करणेसाठी दि.१७.०३.२०२५ रोजी प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असून चौकशी कामकाज सुरू आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इयत्ता दहावी व बारावी परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत

**(३०) * २३२४१ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षांमध्ये कॉपीसारखे गैरप्रकार रोखण्यासाठी करण्यात आलेल्या कारवाईअंतर्गत राज्यभरातील दहावीची ३१ व बारावीची ७६ अशी एकूण १०७ परीक्षा केंद्रांची मान्यता रद्द करण्यात आल्याची माहिती दिनांक

१३ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कारवाईअंतर्गत मान्यता रद्द करण्यात आलेल्या परीक्षा केंद्रांचे तपशील शासनास सादर केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दहावी व बारावीच्या परीक्षांमध्ये कॉपीसारखे तसेच अन्य गैरप्रकार कायमस्वरूपी रोखण्यासाठी शासनाने कोणती उपययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या बोर्ड परीक्षांचे आयोजन गुणवत्तापुर्ण व सुरक्षित वातावरणात होण्यासाठी गतवर्षी प्रमाणे यावर्षी देखील राज्यात कॉपीमुक्त परीक्षा अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणी साठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.
१.ज्या शाळांमध्ये इयत्ता १२ वी व इयत्ता १० वी चे परीक्षाकेंद्र देण्यात आले आहेत,त्या शाळांमध्ये सीसीटीव्ही अनिवार्य करण्यात आले आहेत.
२.ज्या परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही नाहीत तेथील केद्रसंचालक,पर्यवेक्षक,शिपाई व इतर कर्मचारी यांची अदलाबदल करण्यात आली आहे.
३.गैरप्रकरणांबाबत संवेदनशील असलेल्या परीक्षा केंद्रावर "बैठे पथक" नेमण्यात आले आहे.
४.प्रत्येक जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समिती स्थापन करण्यात आली आहे व दिनांक ९ जानेवारी २०२६ च्या शासन निर्णयान्वये दक्षता समितीची जबाबदारी व कार्ये निश्चित करण्यात आली आहेत.
५.परीक्षा केंद्रावर अकस्मात भेटी देण्यासाठी भरारी पथके तयार करण्यात आली.
६.इयत्ता १२ वी व इयत्ता १० वी च्या बोर्ड परीक्षांदरम्यान गैरप्रकरणांमध्ये दोषी आढळून आलेल्या व्यक्तींवर तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
७.अतिसंवेदशील केंद्रावर नियंत्रण ठेवण्यासाठी अश्या परीक्षा केंद्रांवर ड्रोन च्या माध्यमाने निगराणी ठेवण्यात येत आहे.
८.Maharashtra Prevention of Malpractices Act १९८२ या कायद्याची अंमलबजावणी करण्यासंबंधी व कोणत्याही परीक्षा केंद्रावर गैरप्रकार घडल्यास गैरप्रकारांना उद्युक्त करणारे, मदत करणारे व प्रत्यक्ष गैरमार्ग करणाऱ्यांवर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगणा (जि.नागपूर) तालुक्यातील एमआयडीसी परिसरातील प्रतिभा प्रिंटर्स या छापखाण्यात बालभारतीची बनावट पुस्तके छापली जात असल्याबाबत

**(३१) * २३२४६ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (बालभारती) मार्फत दरवर्षी अधिकृत कंत्राटदारांमार्फत शालेय अभ्यासक्रमांची पाठ्यपुस्तके छापली जातात मात्र नागपूर येथील हिंगणा

एमआयडीसी परिसरातील ‘प्रतिभा प्रिंटर्स’ या छापखान्यावर टाकलेल्या छाप्यात मोठ्या प्रमाणावर बालभारतीची बनावट पाठ्यपुस्तके छापली जात असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कारवाईदरम्यान इयत्ता नववी ते बारावी तसेच इतर विषयांची मिळून २० हजारांहून अधिक बनावट पाठ्यपुस्तके जप्त करण्यात आली असून संबंधित खाजगी प्रिंटिंग प्रेसमध्ये बेकायदेशीर छपाई सुरू असल्याचे आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये अशा प्रकारच्या बनावट व अवैध छपाईला आळा घालण्यासाठी सर्व खाजगी प्रिंटिंग प्रेसची तपासणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) होय.
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या (बालभारती) अधिकाऱ्यांनी नागपूर येथील संबंधित मुद्रणालयात जावून प्रत्यक्ष पाहणी केली असून याबाबत संबंधितांवर एफआयआर क्र.१०९९ दिनांक १७ डिसेंबर, २०२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच संबंधित मुद्रणालयाचे मालक यांना अटक करण्यात आली आहे आणि सदर पुस्तकांचा साठाही जप्त करण्यात आला आहे.
(५) राज्यातील इतर ठिकाणी अशा प्रकारच्या बनावट व अवैध छपाईला आळा घालण्यात आला असून मंडळाच्या विभागीय अधिकारी/कर्मचारी यांना अवगत करुन आवश्यकता भासल्यास प्रत्यक्ष पाहणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, अधिकृत पाठ्यपुस्तके व बनावट पाठ्यपुस्तके यांच्यातील फरक ओळखण्यासाठी यावर्षीपासून पाठ्यपुस्तकांच्या मुख्यपृष्ठ क्र.४ व मजकूराच्या सुरुवातीच्या आणि अंतिम पृष्ठावर क्यूआर कोड छपाई करण्यात येणार आहे. याबाबत विद्यार्थी, पालक व पुस्तक विक्रेते यांना माहिती देण्यासाठी माहे मे व जून या महिन्यांमध्ये प्रसिद्धी माध्यमांव्दारे माहिती दिली जाणार आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री. जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.